

कुलगुरु कै. वि. गं. तथा
दादासाहेब केतकर



धनुर्धारी श्रीराम लक्ष्मण

स्थापना १२ मे १९०९



शिक्षणमहर्षी कै. डॉ. ग. श्री.
तथा अण्णासाहेब खैर


पुणे विद्यार्थी गृहाचे मासिक

# समाचार

Pune Vidyarthi Griha's 'Samachar' Magazine August 2024 - Pages - 52

संपादक : श्री. राजेंद्र विठ्ठल बोऱ्हाडे | कार्यकारी संपादक : श्री. सुभाष मल्लाप्पा जिर्गे

* पुणे * वर्ष ७५ * अंक १० * किंमत रु. १०/- * वार्षिक वर्गणी रु. १००/-




पुणे विद्यार्थी गृहाच्या
म्हसरूळ, नाशिक शाखेस
दै. देशदूत यांच्या तर्फे
'गुरू सन्मान पुरस्कार'
प्राप्त झाला.
मा. श्री. चंद्रकांतदादा पाटील,
उच्च व तंत्रशिक्षणमंत्री
यांचे हस्ते पुरस्कार स्वीकारताना
कार्यवाह श्री. संजय गुंजाळ

## ⁕ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, घाटकोपर शाखा, मुंबई ⁕



विद्याभवन माध्यमिक मराठी विभागातील इ. ५वी व ८वी शिष्यवृत्ती प्राप्त २२ विद्यार्थ्यांच्या समवेत कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, मुख्याध्यापिका श्रीमती योगिनी पोतदार, उपमुख्याध्यापिका श्रीमती ज्योती देसाई, इंग्रजी विभागाचे मुख्याध्यापक श्री. सुनिल पाटील, समन्वयिका श्रीमती सरला नरेंद्रन् आणि मार्गदर्शक शिक्षक-शिक्षिका



विद्याभवन हायस्कूल नं. २ माध्यमिक इंग्रजी विभाग पूर्व उच्च प्राथमिक व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत गुणवत्ता यादीत झळकलेल्या ६९ विद्यार्थ्यांसमवेत कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, मुख्याध्यापक आणि शिक्षक वर्ग

विद्याभवन, घाटकोपर शालेय संकुलातील एकूण ९१ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती प्राप्त झाली.



संस्था मुख्यालय, पुणे ३० येथे दि. ७ ऑगस्ट २०२४ रोजी संस्थेच्या देणगीदार श्रीमती गीतांजली शशिकांत लिमये यांचे पुष्पगुच्छ देऊन आभार मानताना संचालक प्रा. राजेंद्र कडुसकर,
या प्रसंगी उपस्थित डावीकडून प्र. प्राचार्य डॉ. मनोज तारांबळे, संचालक श्री. रमेश कुलकर्णी
ग्रुप कॅप्टन राजीव केतकर (निवृत्त) आणि त्यांच्या पत्नी सौ. केतकर,
देणगीदार श्रीमती गीतांजली लिमये यांच्या कन्या कु. योगिता लिमये आणि सौ. विनिता लक्ष्मीनारायण,
शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थी कु. हर्ष माने आणि कु. कल्याणी साळुंखे,
कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी आणि संचालक श्री. सुनिल रेडेकर

संपादकीय

# भारतीय स्वातंत्र्य दिन

'स्वातंत्र्य' हे मानवी जीवनातील एक सर्वश्रेष्ठ आणि उच्चतम मूल्य आहे. जीवनात कोणतेही ध्येय प्राप्त करावयाचे असेल, आत्मसात करावयाचे असेल तर,

'पदोपदी पसरून निखारे, आपुल्याच हाती,
होऊनिया बेहोष धावलो, ध्येयपथावरती,
कधी न थांबलो विश्रांतीस्तव, पाहिले न मागे,
बांधू न शकले प्रीतीचे वा कीर्तीचे धागे,
एकच तारा समोर होता, पायतळी अंगार
आई, पायतळी अंगार,
गर्जा जयजयकार क्रांतीचा गर्जा जयजयकार ।

या वृत्तीनेच त्या ध्येयपथावरून वाटचाल करावी लागते. म्हणूनच आपल्याकडे म्हटले आणि मानले जाते, 'रणाविण कोणा स्वातंत्र्य मिळाले'.

आपल्या इतिहासाचा जर आपण मागोवा घेतला तर, छत्रसाल बुंदेला, छत्रपती शिवाजी महाराज, राणा प्रताप यांनी परकीय आक्रमण झुगारून देण्यासाठी स्वातंत्र्ययज्ञ मांडला. त्यात त्यांना यश ही प्राप्त झाले. हे जरी सत्य असले तरी, त्या स्वातंत्र्याची जोपासना आपण फार काळ करू शकलो नाही. त्यानंतरच्या काळात भारतात प्रथमतः व्यापारी म्हणून आलेल्या इंग्रजादी मंडळींनी व्यापारासाठीचा हाती पकडलेला ताजवा फेकून दिला. हाती तलवार धारण केली आणि पाहता पाहता 'आसेतु हिमाचल' पादाक्रांत केला. इ. स. १८१८ मध्ये पेशवाई बुडाली आणि आपल्यावर 'अंमल इंग्रज सरकारका' सुरू झाला. आपले साम्राज्य अधिकाधिक बळकट करण्यासाठी साम, दाम, दंड, भेद या चतुःसूत्रीचा वापर करीत ब्रिटिशांनी त्यांचे पाय आपल्या भारतात घट्ट रोवले. पण तत्कालीन नेतृत्वाने सुस्थिर होणाऱ्या या ब्रिटिश साम्राज्याला इ. स. १८५७ मध्ये स्वातंत्र्य आंदोलन पुकारुन एक मोठाच दणका दिला. परंतु आपल्याकडील आपापसातील दुही, परकीयांचे आधुनिक तंत्रज्ञान आणि त्यांची प्रगत हत्यारे आदी कारणांमुळे आपला स्वातंत्र्य लढा पूर्णतः यशस्वी झाला नाही. परंतु जनमानसातील स्वातंत्र्याची ओढ, आपल्या अमानुष दमनचक्रानेही ब्रिटिश सरकार दडपू शकले नाही. परकीय सत्तेविरूध्द धुमसरणाऱ्या या असंतोषाला राणी लक्ष्मीबाई, तात्या टोपे, मंगल पांडे, शहीद भगतसिंग, लाला लजपतराय, बाळ गंगाधर टिळक, बंकीमचंद्र पाल, सुखदेव, नेताजी सुभाषचंद्र बोस, बाबू गेनू, नंदुरबारचा कोवळा शिरीषकुमार, स्वातंत्र्यवीर सावरकर आणि त्यांचे बंधू, चाफेकर बंधू, मदनलाल धिंग्रा, वासुदेव बळवंत फडके, गोपाळकृष्ण गोखले, महात्मा गांधी, मॅडम कामा, जवाहरलाल नेहरु आदी अनेकानेक नेत्यांनी खतपाणी घातले. वेळप्रसंगी 'भेटेन नऊ महिन्यांनी' म्हणत भारतमातेच्या चरणी आत्मसमर्पण केले. अर्थात या स्वातंत्र्यलढ्यात आम जनतेचाही मोठाच सहभाग होता. परिणामी १५ ऑगस्ट १९४७ रोजी आपण स्वतंत्र झालो.

तेव्हा, ‘आम्हाला स्वतंत्र भारताचा एक असा भव्य प्रासाद उभारायचा आहे की, ज्यात तिची सर्व लेकरे आनंदाने राहू शकतील. कोणाच्याही डोळ्यात दुःखाश्रूचा एकही थेंब नसेल’ असे राष्ट्रउभारणीचे एक सुंदर स्वप्न तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांनी रंगविले होते. ते स्वप्न साकार करण्याच्या दृष्टीने पंचवार्षिक योजना, विज्ञानवादी दृष्टिकोन, स्वातंत्र्य, समता, बंधुत्व आणि मानवता तत्त्वांचा राष्ट्रीय पातळीवर पाठपुरावा करण्याची प्रक्रिया सुरू झाली. त्याची फळे आज भारतातील सर्वसामान्य जनता उपभोगत आहे. स्वातंत्र्योत्तर कालखंडात आपली भौतिक आणि वैज्ञानिक प्रगती जरी मोठ्या प्रमाणात झाली असली तरी, अजूनही आम जनतेच्या उन्नयनासाठी आखलेल्या जनकल्याण योजना समाजात तळागाळपर्यंत रूजल्या नाहीत. अज्ञान आणि दारिद्र्य हे आपल्या समाजाचे दोन प्रमुख शत्रू असल्याने, तसेच समाजावरील काही प्रमाणातल्या त्यांच्या वरचष्म्यामुळे आजही आपल्याला अनेक आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. सर्व प्रजेसाठी प्रत्येकाच्या आवडीचे व प्रत्येकाला परवडणाऱ्या शिक्षणाचे मार्ग उपलब्ध करून देणे, लोकांच्या अन्न, वस्त्र आणि निवारा या प्राथमिक मूलभूत गरजा पूर्ण करणे आदी आव्हानांचा सामना करून त्यावर आपणाला विजय मिळवायचा आहे. त्यासाठी प्रत्येक भारतीयाने अथक आणि कठोर परिश्रम करणे अत्यावश्यक आहे. तरच आपल्या पूर्वजांनी केलेल्या स्वातंत्र्य लढ्याचे सार्थक होईल. स्वतंत्र भारताची सद्यःस्थिती पाहता,

‘हिमालयाच्या हिमसौधाचा लोभ शंकराला
क्रीडा तेथे करण्याचा का वीट तुला आला?
होय आरसा अप्सरसांना सरसे करण्याला
सुधाधवल जान्हवीस्त्रोत तो का गे त्वां त्यजिला?
स्वतंत्रते या सुवर्ण भूमीत कमती काय तुला?
कोहिनूरचे पुष्प रोज घे ताजे वेणीला
ही सकल श्री संयुता, अमुची माता भारती असता
का तुवा ढकलुनी दिधली ?
पूर्वीची ममता सरली
जीव तळमळे का तू त्यजिले
उत्तर याचे दे
स्वतंत्रते भगवति त्वां अहं यशोयुतां वन्दे ।

असेच म्हणावेसे वाटते. त्या स्वातंत्र्य देवतेने आपल्या परिपूर्ण वैभवानिशी आमच्या भारतमातेवर वरदहस्त ठेवून तिला पुनःश्च सर्वार्थाने सुबत्तेचे वरदान द्यावे ही तिच्या चरणी प्रार्थना.

भारतीय स्वातंत्र्य चिरायू होवो,

सर्वांना भारतीय स्वातंत्र्याच्या शुभेच्छा, जयहिंद !

दि. २३ जुलै २०२४
लोकमान्य बाळ गंगाधर टिळक जयंती



गीतामहर्षी स्वर्गीय
गुरुवर्य डॉ.ग.श्री.तथा
अण्णासाहेब खैर

**स्थळ :**
**पुणे विद्यार्थी गृहाचे**
**दादासाहेब केतकर सभागृह,**
४४, विद्यानगरी, शिवदर्शन,
पर्वती, पुणे ४११००९.
फोन - ०२०-२४४७०९२७

# डॉ. खैरकुल गीता-निधी स्मृती व्याख्यानमाला
## अडतिसावे पुष्प

स. न. वि. वि.
गीतामहर्षी व शिक्षणतज्ज्ञ स्वर्गीय गुरुवर्य डॉ. ग. श्री. तथा अण्णासाहेब खैर यांच्या ३८व्या स्मृतिदिनानिमित्त **गुरुवार दि. २९/०८/२०२४** रोजी **दुपारी ४ वाजता** प्रकट व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

**व्याख्याते : मा. डॉ. शैलेंद्र देवळाणकर**
**(उच्च शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे)**
**विषय : विकसित भारत आणि उच्च शिक्षणाची भूमिका**

कृपया आपण या कार्यक्रमास जरूर यावे, ही विनंती.

आपले नम्र,

| **दिनेश मिसाळ** | **कृष्णाजी कुलकर्णी** | **संजय गुंजाळ** | **एस.एम.जिर्गे** | **राजेंद्र बोऱ्हाडे** |
| --- | --- | --- | --- | --- |
| कुलसचिव | कोषाध्यक्ष | कार्यवाह | उपकार्याध्यक्ष | कार्याध्यक्ष |

पुणे विद्यार्थी गृह, पुणे ४११०३०.

## जीवनातील खेदाचे प्रसंग

जीवनात आपल्याला काही काही वेळा औदासीन्याचे आणि विषण्णतेचे प्रसंग येतात. आपण आपल्या परीने चांगली कामे करीत असतो. सद्बुद्धीने करतो. तन-मन-धन लावून करतो. किंबहुना आपले जीवन त्या कामी पणाला लागलेले असते.

सामान्यपणे अशा सत्कृत्यांचे लोक कौतुकच करीत असतात; पण असे नेहमीच होते असे नाही. काही प्रसंग असे येतात की, आपल्या कामाविषयी कोणीतरी उणे बोलतो; कुत्सितपणाने बोलतो; स्वार्थाचे आरोप करतो; आपल्या कामाला कमीपणा आणि आपल्या हेतूंना हीनता येईल असे उद्‌गार काढतो.

असे करण्यात घरातील माणसे, मित्र, परिचित, सहकारी, वरिष्ठ अधिकारी, आश्रित किंवा नोकर-चाकर असतील किंवा आपल्या वाइटावर असलेले आणि आपला उत्कर्ष सहन न होणारे शत्रू किंवा विघ्नसंतोषी असतील. इतरांच्या कामावर आपण सहज जाता जाता शिंतोडे उडवतो, याची जाणीव ठेवणारे व विचार करून बोलणारे फार थोडे लोक असतात.

अशा माणसांकडून आपली व आपल्या कामाची अवहेलना झाली म्हणजे मनाला खेद होतो. खंत वाटते. अस्वस्थता येते. हा मनुष्यस्वभाव आहे.

काम करूच नये असे वाटते. अशा वेळी काय करावे? कसे वागावे? मनाचे समाधान कसे करावे?

मी अशा प्रसंगी विचार करतो-माझे काही चुकले आहे का? असल्यास सुधारणा करीन. माझे चुकले नसल्यास इतरांच्या अवहेलनेला मी का भ्यावे? अवहेलना करणारे क्षुद्र बुद्धीचे आहेत. मी मनाला त्रास करून घेतला तर त्यांना आनंदच वाटेल. ज्यांचे चुकते त्यांनी मनाला खंत वाटू द्यावी. मी का खेद मानावा?

**डॉ. ग. श्री. खैर (ऑगस्ट १९५४)**

# महाराष्ट्र मुद्रण तंत्र संस्था, पुणे

**संचालक : डॉ. राजेंद्र संपत कांबळे**

**प्र. प्राचार्य : प्रा. पी. व्ही. शिंदे**

**उन्हाळी परीक्षा २०२४ निकाल**

महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांच्या वतीने घेण्यात आलेल्या पदविका अभियांत्रिकी उन्हाळी परीक्षा - २०२४ चा निकाल नुकताच जाहीर करण्यात आला. पदविका अभ्यासक्रमाच्या तृतीय वर्षाचा निकाल १००% लागला. तृतीय वर्षातील एकूण ६० विद्यार्थ्यांपैकी ४८ विद्यार्थ्यांनी ७५ टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळविले आहेत. तसेच १२ विद्यार्थी प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले आहेत.

| वर्ष | विद्यार्थ्याचे नाव | शेकडा गुण | क्रमांक |
|---|---|---|---|
| प्रथम | कु. आर्यन अकोले | ८६.३५ | प्रथम |
| | कु. विक्रांत माने | ८१.७६ | द्वितीय |
| | कु. संकेत इंगोले | ७९.७६ | तृतीय |
| द्वितीय | कु. उज्वल शर्मा | ८१.७५ | प्रथम |
| | कु. मोनाली काळे | ८०.७५ | द्वितीय |
| | कु. आर्यन बोराटे | ८०.५० | तृतीय |
| तृतीय | कु. सौरव वानखेडे | ९०.५० | प्रथम |
| | कु. वैभव लिंगशेट्टी | ८७.३३ | द्वितीय |
| | कु. अभिषेक दासखेडकर | ८७.३३ | द्वितीय |
| | कु. साक्षी सोनावणे | ८६.३८ | तृतीय |

**कौशल्य विकास दिंडी**

महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत कौशल्य विकास दिंडीचे आयोजन गोळीबार मैदान, पुलगेट, पुणे ते हडपसर या भागात करण्यात आले होते. प्र. प्राचार्य पी. व्ही. शिंदे, प्रा. ए. ए. रावेतकर, प्रा. एस. बी. शेळकंदे व श्री. आर. एल. गभाले यांनी दिंडीमध्ये सहभाग घेऊन संस्थेत उपलब्ध असणाऱ्या अभ्यासक्रमाबद्दल जनजागृती केली.

**प्लेसमेंट २०२४**

प्रतिवर्षीप्रमाणे डिप्लोमा इन प्रिंटिंग टेक्नॉलॉजीच्या अंतिम वर्षातील १४ विद्यार्थ्यांची निवड कॅम्पस प्लेसमेंट्सच्या माध्यमातून विविध कंपन्यांमध्ये करण्यात आली. उर्वरित सर्व विद्यार्थी उच्च शिक्षणासाठी इच्छुक आहेत.

| अ. क्र. | कंपनीचे नाव | निवड झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या |
|---|---|---|
| १ | हायटेक इंक्स प्रा. लि., वापी | ०३ |
| २ | पार्कसन पॅकेजिंग लि., चाकण, पुणे | ०८ |
| ३ | कोट्स अँड पॅक, अंधेरी, मुंबई | ०१ |
| ४ | आर पॅक लि., नवी मुंबई | ०१ |
| ५ | पार्कसन ग्राफिक्स, तळोजा, नवी मुंबई | ०१ |

या कॅम्पस प्लेसमेंटचे संयोजन प्रा. एस. बी. शेळकंदे यांनी केले.

**सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि त्यांच्या मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेच्यावतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा !**

***

**आपला पत्ता बदललेला आहे का?**

**समाचार संदर्भातील आपला बदललेला पत्ता त्वरित कळवावा ही विनंती.**

**पत्ता कळविताना जुना व नवा दोन्ही पिन कोड तसेच आपला ईमेल आयडी सुध्दा कळवावा म्हणजे आपणास ई-समाचार पाठविणे सोईचे होईल.**

pvgsamachar@gmail.com

**या ईमेल आयडी वर कळवावे.**

**संपादक**

# * महाराष्ट्र मुद्रण तंत्र संस्था, पुणे *

## एमएसबीटीई उन्हाळी २०२४ परीक्षा निकाल

### प्रथम वर्ष प्रथम तीन क्रमांक प्राप्त विद्यार्थी



कु. आर्यन अकोले
प्रथम
८६.३५%



कु. विक्रांत माने
द्वितीय
८१.७६%



कु. संकेत इंगोले
तृतीय
७९.७६%

### द्वितीय वर्ष प्रथम तीन क्रमांक प्राप्त विद्यार्थी



कु. उज्ज्वल शर्मा
प्रथम
८१.७५%



कु. मोनाली काळे
द्वितीय
८०.७५%



कु. आर्यन बोराटे
तृतीय
८०.५०%

### अंतिम वर्ष प्रथम तीन क्रमांक प्राप्त विद्यार्थी



कु. सौरव वानखेडे
प्रथम
९०.०५%



कु. वैभव लिंगशेट्टी
द्वितीय
८७.३३%



कु. अभिषेक दासखेडकर
द्वितीय
८७.३३%



कु. साक्षी सोनावणे
तृतीय
८६.३८%

# मुक्तांगण इंग्लिश स्कूल व कनिष्ठ महाविद्यालय

**संचालक : श्री. आनंद कुलकर्णी**
**उपकार्याध्यक्ष : श्री. एस. एम. जिर्गे**
**प्राचार्या : सौ. मीना राणे**
**पर्यवेक्षिका : सौ. रेखा बाली**

## पूर्व प्राथमिक विभाग

### आंतर राष्ट्रीय योग दिवस

शुक्रवार दि. २१ जून २०२४ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिवस अतिशय उत्साहात पार पडला. या दिवशी शिक्षकांनी विद्यार्थ्यांना योगासने व व्यायामाचे महत्त्व सांगितले. सर्व विद्यार्थ्यांनी एकत्रितपणे काही योगासने केली. तसेच थोडा प्राणायाम व ओंकाराचे उच्चारण केले. नवीनच बसविलेल्या स्मार्ट बोर्डवर विद्यार्थ्यांना योगाबद्दलची एक ॲनिमेटेड कविता दाखविण्यात आली.

### पालकसभा

शनिवार दि. २९ जून २०२४ रोजी पूर्व प्राथमिक विभागाची पहिली पालकसभा पार पडली. शिशुगट व छोटा गट यांची पालकसभा सकाळी ९ ते १० या वेळेत घेण्यात आली. मोठ्या गटाची पालकसभा सकाळी ११ ते १२ या वेळेत घेण्यात आली. या सभेमध्ये पालकांना स्मार्ट बोर्ड द्वारे पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन दाखविण्यात आले. पालकांना शाळेच्या नियमांबद्दल माहिती देण्यात आली. वर्षभर घेण्यात येणाऱ्या स्पर्धा, साजरे करण्यात येणारे विविध सण व अभ्यासाबद्दल शिक्षकांनी मार्गदर्शन केले. तसेच पालकांच्या शंकांचेही निरसन करण्यात आले.

### वृक्षारोपण सप्ताह

जुलै महिन्यातील पहिला आठवडा वृक्षारोपण सप्ताह म्हणून साजरा करण्यात येतो. प्रतिवर्षीप्रमाणे या वर्षीही गुरुवार दि. ४ जुलै २०२४ रोजी विद्यार्थ्यांनी वृक्षारोपण करुन तो साजरा केला. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना झाडांचे महत्त्व व उपयोग समजावून सांगितले. तसेच 'एकता का वृक्ष' ही ॲनिमेटेड फिल्म दाखविण्यात आली. या दिवशी विविध उपक्रम राबविण्यात आले.

शिशुगटाने चित्रकलेच्या वहीत झाडाच्या चित्रात पेपरकपचे ठसे घेतले. छोट्या गटाने चित्रकलेच्या वहीत, हाताच्या पंजाच्या ठशापासून झाड बनविले. मोठ्या गटातील विद्यार्थ्यांनी पेपरकपमध्ये माती घालून हळीवाच्या बियांचे रोपण केले.

## प्राथमिक विभाग

### आंतरराष्ट्रीय योगदिन

शुक्रवार दि. २१ जून २०२४ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. क्रीडा विभागाचे शिक्षक श्री. विशाल गोरे, श्री. बलराज शोभणे व सौ. सारिका करकंडे यांनी इ. १ ली ते इ. ६ वी च्या विद्यार्थ्यांसमवेत योग प्रात्यक्षिके सादर केली. या कार्यक्रमाची सांगता संगीत शिक्षिका सौ. सुचेता परांजपे यांच्या गीताने झाली.

### पालक शिक्षक सभा

शनिवार दि. २९ जून २०२४ रोजी इ. १ली ते इ. ६ वी च्या पालकांची सभा नियोजित वेळेत घेण्यात आली. यावेळी सर्व वर्गशिक्षिकांनी तसेच प्रत्येक विषयाच्या शिक्षकांनी पालकांशी आपल्या विषयाची माहिती देऊन संवाद साधला. स्मार्ट बोर्डच्या माध्यमातून वर्ग शिक्षिकांनी पालकांशी शालेय महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा केली आणि पालकांच्या शंकांचे निरसन केले. या सभेत पालक प्रतिनिधी तसेच माता पालक प्रतिनिधी यांची निवड करण्यात आली.

### पालक प्रतिनिधी व माता पालक प्रतिनिधी सभा

शनिवार दि. ६ जुलै २०२४ रोजी पहिली पालक प्रतिनिधी व माता पालक प्रतिनिधी सभा घेण्यात आली. या सभेसाठी इ. १ ली ते इ. ६ वी चे पालक प्रतिनिधी उपस्थित होते. या सभेत उपस्थित पालक प्रतिनिधींतून काही पालकांची विविध पदांवर नियुक्ती करण्यात आली. यावेळी विभागाच्या प्रभारी मुख्याध्यापिका सौ. रेखा बाली यांनी शालेय उपक्रम, वर्षभरामध्ये

घेण्यात येणाऱ्या विविध स्पर्धा यांची माहिती देऊन पालकांशी संवाद साधला. या सभेसाठी पर्यवेक्षिका सौ. स्वाती महाजन व सौ. मनिषा नाईक तसेच सर्व शिक्षक उपस्थित होते.

**वृक्षारोपण सप्ताह**

शनिवार दि. ६ जुलै २०२४ रोजी वृक्षारोपण सप्ताह साजरा करण्यात आला. या सप्ताहात सर्व सूचना फलक विद्यार्थ्यांनी काढलेली चित्रे आणि तयार केलेली घोषवाक्ये यांनी सजविण्यात आले होते. सौ. वैशाली डबीर यांनी वृक्षारोपण सप्ताहाची माहिती विद्यार्थ्यांना दिली. या उपक्रमात प्रभारी मुख्याध्यापिका सौ. रेखा बाली, पर्यवेक्षिका सौ. स्वाती महाजन व सौ. मनिषा नाईक यांनी शालेय परिसरात वृक्षारोपण करुन विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविला.

**इंग्रजी हस्ताक्षर स्पर्धा**

शनिवार दि. ६ जुलै २०२४ रोजी इ. १ ली ते इ. ६ वी च्या विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी हस्ताक्षर स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेसाठी इयत्तेनुसार खालील शिक्षकांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

| इयत्ता | परिक्षकाचे नाव |
|---|---|
| इ. १ ली | सौ. तेजस्विनी आठल्ये |
| इ. २ री | सौ. शिल्पा पाटील |
| इ. ३ री | सौ. संज्योत दामले |
| इ. ४ थी | सौ. दीपाली दवणे |
| इ. ५ वी | सौ. केतकी पुजारी |
| इ. ६ वी | सौ. प्रतिक्षा मराठे |

या स्पर्धेचा निकाल खालीलप्रमाणे -

| विद्यार्थ्याचे नाव | इ / तु | क्रमांक |
|---|---|---|
| कु. अवनी गवते | इ. १ ली ब | प्रथम |
| कु. विघ्नेश सावंत | इ. १ ली ड | द्वितीय |
| कु. ओवी भावसार | इ. १ ली अ | तृतीय |
| कु. समर्थ सोहनी | इ. २ री इ | प्रथम |
| कु. शौर्य खंडागळे | इ. २ री क | द्वितीय |
| कु. अवंती आलेगावकर | इ. २ री अ | तृतीय |
| कु. आराध्या मांडे | इ. ३ री क | प्रथम |
| कु. अथर्व पानसरे | इ. ३ री ब | द्वितीय |
| कु. मनस्विनी महाजन | इ. ३ री क | तृतीय |
| कु. तनिष्का सुरवसे | इ. ४ थी इ | प्रथम |
| कु. आरोही बोरडे | इ. ४ थी अ | द्वितीय |
| कु. अबीर मोहिते | इ. ४ थी क | तृतीय |
| कु. स्वराली विश्वे | इ. ५ वी इ | प्रथम |
| कु. वेदिका कोंडे | इ. ५ वी क | द्वितीय |
| कु. श्रीराज भोला | इ. ५ वी अ | तृतीय |
| कु. श्रीराम रूद्रासन | इ. ६ वी इ | प्रथम |
| कु. समिक्षा पिसे | इ. ६ वी ड | द्वितीय |
| कु. प्रांजल सालेकर | इ. ६ वी इ | तृतीय |

**चित्रकला स्पर्धा**

शनिवार दि. १३ जुलै २०२४ रोजी इ. १ ली ते इ. ६ वीच्या विद्यार्थ्यांची चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. प्रत्येक इयत्तेसाठी वेगवेगळे विषय देण्यात आले होते. या स्पर्धेचे परीक्षण खालील शिक्षिकांनी केले.

| इयत्ता | परिक्षकाचे नाव |
|---|---|
| इ. १ ली व इ. २ री | सौ. धनश्री गुर्जर |
| इ. ३ री व इ. ४ थी | सौ. सीमा जोशी |
| इ. ५ वी व इ. ६ वी | सौ. जयती नरवणे |

**अभिनंदनीय**

दि. ३ मार्च २०२४ रोजी घेण्यात आलेल्या टिळक महाराष्ट्र विद्यापीठ (TMV) गणित परीक्षेत विद्यार्थी कु. कौस्तुभ मयूर जगदाळे इ. ६ वी ब याने विशेष प्राविण्य मिळविले. कु. कौस्तुभ मयूर जगदाळे याने १०० पैकी ९५ गुण मिळवून महाराष्ट्रात द्वितीय क्रमांक मिळविला आहे. कु. कौस्तुभ यास महाराष्ट्र विद्यापीठ भवन येथे रविवार दि. १४ जुलै २०२४ रोजी प्रशस्तिपत्रक व चषक देऊन गौरविण्यात आले. **कु. कौस्तुभ मयूर जगदाळे याचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा !**

## माध्यमिक विभाग

### पालक शिक्षक सभा

दि. २९ जून २०२४ रोजी इ. ७ वी ते इ. १० वी च्या पालकांची पालक शिक्षक सभा आयोजित करण्यात आली होती. स्मार्ट बोर्डच्या माध्यमातून वर्गशिक्षिकांनी पालकांशी शालेय महत्त्वाच्या विषयांवर चर्चा केली व त्यांच्या शंकांचे निरसन केले. सर्व वर्गशिक्षिकांनी आणि प्रत्येक विषयाच्या शिक्षकांनी पाठ्यक्रम आणि परीक्षांचे स्वरूप याविषयी पालकांना सविस्तर माहिती दिली. या सभेत पालक प्रतिनिधींची निवड करण्यात आली. सर्व पालकांनी सभेस चांगला प्रतिसाद दिला.

### पालक प्रतिनिधी व माता पालक प्रतिनिधी सभा

दि. ६ जुलै २०२४ रोजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागाची पहिली शिक्षक, पालक प्रतिनिधी व माता पालक प्रतिनिधी सभा घेण्यात आली. या सभेत उपस्थित पालक प्रतिनिधींमधून काही पालकांची विविध पदांवर नियुक्ती करण्यात आली. यावेळी मुख्याध्यापिका सौ. मीना राणे यांनी उपस्थित पालक प्रतिनिधींशी संवाद साधला व महत्त्वाच्या मुद्दयांवर चर्चा केली. या सभेसाठी पर्यवेक्षिका सौ. सुप्रिया देशकुलकर्णी, सौ. जयती नरवणे, उच्च माध्यमिक विभागाच्या प्रमुख डॉ. सौ. स्वाती निकम तसेच इ. ७ वी ते इ. १२ वी च्या वर्गशिक्षिका व पालक प्रतिनिधी उपस्थित होते.

### स्पेक्ट्रोस्कोपी या विषयावर व्याख्यानाचे आयोजन

दि. १३ जुलै २०२४ रोजी आयुका पुणे येथे ॲस्ट्रॉनॉमी क्लबच्या इ. ९ वी च्या विद्यार्थ्यांसाठी प्रख्यात शास्त्रज्ञ श्री. आनंद यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या व्याख्यानाचा विषय 'स्पेक्ट्रोस्कोपी पध्दतीचा वापर करुन विश्वाचे डिकोडिंग करणे' हा होता.

### शैक्षणिक क्षेत्र सहलींचे आयोजन

दि. १३ जुलै २०२४ रोजी इ. ८ वी च्या अ, ब आणि क तुकडीच्या विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक क्षेत्र सहलीचे आयोजन पुण्यातील इतिहास, पुरातत्त्व आणि संस्कृत या क्षेत्रातील अग्रगण्य संस्था असलेल्या डेक्कन कॉलेज येथे करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांना इतिहास संग्रहालय, पुरातत्त्व संग्रहालय तसेच संस्कृत ग्रंथालय देखील दाखविण्यात आले. संस्कृत शब्दकोश तयार करण्याची पध्दत विद्यार्थ्यांना समजावून सागंण्यात आली. तसेच त्यांना तेथील तज्ज्ञांशी संवाद साधण्याची संधी मिळाली.

### विद्यार्थी प्रतिनिधींची निवड

दरवर्षीप्रमाणे या वर्षीही शाळेच्या जनरल, कल्चरल, स्पोर्ट्स सेक्रेटरी या पदांसाठी विद्यार्थी प्रतिनिधींची निवड करण्यात आली. तसेच बोस, टिळक, विवेकानंद, टागोर या चारही कुलाच्या कप्तान आणि उपकप्तान या पदासाठीच्या विद्यार्थी प्रतिनिधींना शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी निवडून दिले. दि. १३ जुलै २०२४ रोजी या सर्व विद्यार्थी प्रतिनिधींना मुख्याध्यापिका सौ. मीना राणे यांच्या हस्ते बॅजेसचे वितरण करण्यात आले. याप्रसंगी पर्यवेक्षिका सौ. सुप्रिया देशकुलकर्णी व सौ. जयती नरवणे आणि सर्व शिक्षिका उपस्थित होत्या.

### इंग्रजी हस्ताक्षर स्पर्धा

दि. २८ जून २०२४ रोजी इ. ७ वी व इ. ८ वीच्या विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी हस्ताक्षर स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेचा निकाल पुढील प्रमाणे

| विद्यार्थ्याचे नाव | इ / तु | क्रमांक |
|---|---|---|
| कु. नंदिनी सागडे | इ. ८ वी ब | प्रथम |
| कु. जान्हवी वाळुंज | इ. ८ वी अ | द्धितीय |
| कु. शार्वी पिंपोडकर | इ. ७ वी ड | तृतीय |

या स्पर्धेचे परीक्षण शिक्षिका सौ. कुमुदिनी पवार आणि उच्च माध्यमिक विभागाच्या शिक्षिका सौ. प्रचिती परांजपे यांनी केले.

### मराठी हस्ताक्षर स्पर्धा

दि. ५ जुलै २०२४ रोजी इ. ७ वी व इ. ८ वीच्या विद्यार्थ्यांसाठी मराठी हस्ताक्षर स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेचा निकाल पुढील प्रमाणे

| विद्यार्थ्याचे नाव | इ / तु | क्रमांक |
|---|---|---|
| कु. श्वेता पवार | इ. ७ वी ड | प्रथम |
| कु. पृथ्वी हुंडेकरी | इ. ७ वी ब | द्वितीय |
| कु. पृथा हुंडेकरी | इ. ८ वी ब | तृतीय |

या स्पर्धेचे परीक्षण शिक्षिका सौ. तेजश्री उदामले यांनी केले.

### अभिनंदनीय

✻ विद्यार्थिनी कु. राजलक्ष्मी बोरकर इ. १० वी क हिने १९ वर्षांखालील असलेल्या बी. सी. सी. आय. मंडळतर्फे औरंगाबाद येथे घेण्यात आलेल्या क्रिकेट स्पर्धेत सहभाग घेतला. कु. राजलक्ष्मी बोरकर हिने परभणी जिल्ह्यातर्फे खेळून उत्कृष्ट गोलंदाज म्हणून पुरस्कार मिळवला.

✻ दि. १३ जुलै २०२४ रोजी खराडी, पुणे येथे झालेल्या राष्ट्रीय तायक्वांदो ॲकॅडेमीने आयोजित केलेल्या खुल्या राष्ट्रीय तायक्वांदो चॅम्पियनशिप स्पर्धेत विद्यार्थी कु. मिलिंद पानगंटी इ. ८ वी ब याने कांस्यपदक मिळविले.

**कु. राजलक्ष्मी बोरकर आणि कु. मिलिंद पानगंटी यांचे संस्थेच्यावतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा !**

## उच्च माध्यमिक विभाग

### पालक शिक्षक सभेचे आयोजन

गुरुवार दि. ४ जुलै २०२४ रोजी पालक - शिक्षक सभेचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी १०.०० वाजता ही सभा अनुक्रमे इ. १२ वी च्या अ, ब, क आणि ड या वर्गाप्रमाणे घेण्यात आली. या सभेत प्रत्येक तुकडीच्या वर्गशिक्षिकांनी संपूर्ण वर्षाच्या नियोजना - बाबत माहिती दिली.

इ. १२ वी चा अभ्यास कसा करावा याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. प्रत्येक विषयाच्या शिक्षिकेने आपआपल्या विषयाच्या परीक्षापध्दतीनुसार माहिती दिली. प्रत्येक तुकडीचा एक या प्रमाणे चारही तुकड्यांत पालक प्रतिनिधी नेमण्यात आले. ✻✻✻

## ✻ मुक्तांगण इंग्लिश स्कुल व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे ९ ✻





दि. ६ जुलै २०२४ रोजी वृक्षारोपण सप्ताहानिमित्त तयार केलेली घोषवाक्ये, लावलेली झाडे दाखविताना विद्यार्थी आणि वृक्षारोपण करताना विद्यार्थिनींसमवेत मुख्याध्यापिका सौ. रेखा बाली, पर्यवेक्षिका सौ. स्वाती महाजन व सौ. मनिषा नाईक

## ✻ मुक्तांगण इंग्लिश स्कुल व कनिष्ठ महाविद्यालय, पुणे ९ ✻



दि. २१ जून २०२४ रोजी 'आंतरराष्ट्रीय योग' दिनानिमित्त प्रात्यक्षिके सादर करताना इ. १ ली ते इ. ६ वी चे विद्यार्थी




दि. ६ जुलै २०२४ प्राथमिक विभागात पालकसभेच्या शिक्षक प्रतिनिधी म्हणून निवड झाल्याबद्दल सौ. शीतल हेगडकर यांचे अभिनंदन करताना प्र. मुख्याध्यापिका सौ. रेखा बाली, समवेत पर्यवेक्षिका सौ. स्वाती महाजन आणि सौ. मनिषा नाईक




दि. १३ जुलै २०२४ रोजी 'डेक्कन कॉलेज', पुणे येथे शैक्षणिक क्षेत्र भेट प्रसंगी इयत्ता आठवीचे विद्यार्थी आणि शिक्षिका



दि.१३ जुलै २०२४ रोजी यावर्षी निवडण्यात आलेले जनरल सेक्रेटरी, कल्चरल सेक्रेटरी, स्पोर्ट्स सेक्रेटरी आणि चारही कुलांचे कप्तान आणि उपकप्तान या विद्यार्थी प्रतिनिधींना बॅजेसचे वितरण प्रसंगी उपस्थित मुख्याध्यापिका सौ. मीना राणे, पर्यवेक्षिका सौ. जयती नरवणे आणि सुप्रिया देशकुलकर्णी

## विद्याभवन–घाटकोपर, मुंबई शाखा

## विद्याभवन पूर्व प्राथमिक सेमी इंग्रजी
## विद्याभवन पूर्व प्राथमिक इंग्रजी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**
**पर्यवेक्षिका : सौ. सिध्दी साळवी (सेमी इंग्रजी),**
**पर्यवेक्षिका : सौ. पूजा फरिया (इंग्रजी माध्यम)**

### योग दिन

'स्वस्थ जीवन जगणं हे जीवनाचे भांडवल आहे, रोज योगा करणे ही रोगमुक्त जीवनाची गुरुकिल्ली आहे' आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून दि. २१.६.२०२४ रोजी पूर्व प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांनी वेगवेगळी योगासने करून योग दिन साजरा केला. विद्यार्थ्यांना सभागृहात नेण्यात आले. योग प्रशिक्षिका सौ. वैशाली खांडेकर यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. योगाच्या सहाय्याने आपण आपली स्मरणशक्ती व एकाग्रता कशी वाढवू शकतो याची माहिती विशद केली व रोजच्या जीवनात योग कसा गरजेचा आहे हे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांकडून योगासनांची वेगवेगळी प्रात्यक्षिके करवून घेतली. विद्यार्थी सुध्दा विविध योगासने आनंदाने करत होते. 'मै छोटा हूँ तो क्या हुआ मै भी योगा कर लेता हूँ' असे त्यांच्या कृतीतून निदर्शनास येत होते.

### आषाढी एकादशी सोहळा

'पावसाच्या सरी, पंढरीची वारी, विटेवरी उभा जनतेचा कैवारी, पंढरीच्या गाभा-यात उठून दिसे माझी विठू रखुमाई'

दि. १६.७.२०२४ रोजी पूर्व प्राथमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी आषाढी एकादशी मोठ्या उत्साहात साजरी केली. यावेळी विविध संतांच्या वेशभूषा विद्यार्थ्यांनी केल्या होत्या. विठ्ठल रखुमाई, संत जनाबाई, बहिणाबाई, संत ज्ञानेश्वर, मुक्ताबाई, रामदास स्वामी, संत एकनाथ अशी अनेक संतमंडळी विद्यार्थ्यांनी साकार केली. तसेच बाकीच्या विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषा - कपाळी टिळा, गळ्यात माळ व टाळ अशी केली. यावेळी समन्वयिका सौ. शुभांगी जाधव व पर्यवेक्षिका सौ. सिध्दी साळवी यांच्या हस्ते पालखीचे पूजन करण्यात आले. पालकांनीही पालखीचे पूजन केले. पर्यवेक्षिका सौ. सिध्दी साळवी यांनी महाराष्ट्राची भक्ती परंपरा व वारकरी संप्रदायचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले. मोठ्या शिशु वर्गातल्या विद्यार्थ्यांनी गोऱ्या कुंभाराची नाटिका सादर केली. शिक्षक व पालकांनी फुगड्यांचा फेर धरला. संपूर्ण वातावरण भक्तीमय होऊन विठ्ठल नामात न्हाऊन गेले. शेवटी शाळेच्या आवारात पालखीची 'पायी हळूहळू चाला मुखाने हरिनाम बोला' असा नाम घोष करत मिरवणूक काढण्यात आली. विद्यार्थ्यांना लाडूचा प्रसाद देऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

## विद्याभवन प्राथमिक इंग्रजी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**
**मुख्याध्यापिका : श्रीमती अनघा संतोष सावंत**

### योग दिन

आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून दि. २१ जून २०२४ रोजी विद्याभवन प्राथमिक इंग्रजी माध्यमातील इ. ४थी च्या विद्यार्थ्यांनी वेगवेगळी योगासने, श्वसनाचे व्यायाम करुन योग दिन साजरा केला.

श्रीमती कामत यांनी विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व पटवून देताना नियमित योग कसा गरजेचा आहे, तसेच मोबाईलच्या वाढत्या व्यसनापायी वाढत जाणारे विविध आजार यावर योग हाच पर्याय कसा असू शकतो याचे महत्त्व विषद केले. योगामुळे शरीर आणि मन कसे तणावमुक्त राहू शकते याबाबत माहिती देऊन वेगवेगळी प्रात्यक्षिके विद्यार्थ्यांकडून करून घेतली.

प्राणायाम, भ्रामरी, ताडासन, वृक्षासन, भुजंगासन, पर्वतासन व त्रिकोणासन करताना विद्यार्थ्यांचा लवचिकपणा सहज लक्षात येत होता.

सहा. शिक्षिका श्रीमती रेश्मा पैलकर यांनी प्रमुख पाहुण्यांची ओळख करुन दिली आणि त्यांचे आभारही

मानले. विद्यार्थ्यांनी आपल्या विद्यार्थीदशेत अभ्यास करताना योगाचा सराव केला तर एकाग्रता वाढीस लागेल आणि याचा फायदा नक्कीच त्यांना त्यांच्या श्रेणी सुधारण्यात होईल. विद्यार्थ्यांनी आपल्या आई-वडिलांबरोबर रोज किमान पंधरा मिनिटे तरी योगा करावा अशी भावना मुख्याध्यापिका श्रीमती अनघा सावंत यांनी व्यक्त केली.

### मोठ्या फाँटची पुस्तके वाटप

सर्व शिक्षा अभियानांतर्गत कमकुवत दृष्टी असलेल्या विद्यार्थ्यांना मोठ्या फाँटची शालेय पुस्तके मुख्याध्यापिका श्रीमती अनघा सावंत यांच्या हस्ते प्रदान करण्यात आली. या विद्यार्थ्यांनी अभ्यासात प्रगती करावी आणि फक्त दृष्टीदोष असल्याने हे विद्यार्थी अभ्यासात मागे राहू नयेत, यासाठी दरवर्षी या विद्यार्थ्यांना महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाकडून ही पुस्तके मोफत पुरविण्यात येतात. याही वर्षी कु. अत्रेय देवधर आणि कु. आदित्य गवळी या विद्यार्थ्यांना ही मोठ्या फाँटची पुस्तके देण्यात आली.

### आषाढी एकादशी

दि. १६.७.२०२४ रोजी विद्यार्थ्यांना आपली संस्कृती ज्ञात व्हावी या दृष्टिकोनातून आषाढी एकादशी मोठया उत्साहात साजरी करण्यात आली.

विद्यार्थ्यांनी यावेळी पारंपरिक वेशभूषा करत विठू नामाचा गजर केला. यावेळी पालखी सोहळयाचे व दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी केलेल्या विठोबा रखुमाईच्या वेशभूषांनी हा सोहळा अधिक रंगला होता. यावेळी विविध संतांची वेशभूषा विद्यार्थ्यांनी साकारली होती. निवृत्तीनाथ, तुकाराम, श्री नामदेव, बहिणाबाई, श्री चक्रधर स्वामी व मुक्ताबाई यांनी आपल्या अभंग वाणीतून महाराष्ट्राला शिकवण दिली आहे. त्याच्यातील काही अंश विद्यार्थ्यांनी यावेळी सादर केला. ह. भ. प. प्रज्वल पिसाळ यांनी कीर्तनरुपी सेवा प्रदान करून विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध केले.

महाराष्ट्राची भक्ती परंपरा व वारकरी संप्रदाय याचे महत्त्व विद्यार्थ्यांना या कार्यक्रमातून सांगण्यात आले. मुख्याध्यापिका श्रीमती अनघा सावंत तसेच सहा. शिक्षिका श्रीमती रेश्मा पैलकर व श्रीमती स्नेहा राणे यांनी विद्यार्थ्यांना याविषयी माहिती दिली. विद्यार्थी पांढऱ्या शुभ्र पोशाखात मस्तकी टिळा, गळयात माळ आणि टाळ घालून वारकरी बनले होते. विद्यार्थिनींनी देखील नऊवारी साडी परिधान करुन डोक्यावर तुळशीची कुंडी घेतलेली होती. दिंडी काढून पालखीची मिरवणूक काढण्यात आली. विठूनामाच्या गजराने शालेय परिसर दुमदुमून गेला होता. 'विठ्ठल विठ्ठल विठल्ला, हरी ओम विठ्ठला' या अभंगाचे सामूहिक गायन करण्यात आले. 'सुंदरते ध्यान उभे विटेवरी, कर कटीवरी ठेवोनिया' या अभंगाचा आधार घेऊन इ. ४थी तील विद्यार्थिनी कु. श्रीजा विपुल कुटे हिने कीर्तन सादर केले.

फुगड्यांचा फेर धरून संपूर्ण वातावरण भक्तीमय झाले होते. संतांचे समाज प्रबोधनातील कार्य, पंढरपूरची वारी आणि कीर्तन या सर्वांची सखोल माहिती सहा. शिक्षक श्री. दीपक निचित यांनी विद्यार्थ्यांना दिली. हरी नामाच्या जयघोषात आषाढी वारी दिंडी सोहळा संपन्न झाला.

### पालक-शिक्षक सभा

या शैक्षणिक वर्षाची पहिलीच पालक शिक्षक संघटनेची सभा घेण्यात आली. या सभेमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी पालक आणि शिक्षक यांच्या मदतीने वर्षभरात घेण्यात येणारे कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले. पालकांचाही उत्स्फूर्त सहभाग विद्यार्थ्यांच्या प्रगतीमध्ये असावा असे मुख्याध्यापिका श्रीमती अनघा सावंत यांनी सांगितले. पालकांना येणाऱ्या अडचणी पालक प्रतिनिधी मार्फत शिक्षकांपर्यंत पोहोचवण्यात आल्या. तसेच व्हाट्सॲप ग्रुप मध्ये सर्वांना वर्गवार समाविष्ट करुन संबंधित सूचना देण्यात आल्या. नवीन प्रतिनिधी निवडण्यात आले. उपकार्याध्यक्ष, सचिव आणि उपसचिव यांची निवड एकमताने करण्यात आली. येऊ घातलेल्या आकारिक मूल्यमापन पध्दती बद्दल चर्चा करण्यात आली. संस्थेच्या वतीने वेगवेगळे खेळ तसेच संगीत अकादमी सुरू झालेली आहे. त्याबद्दलही पालकांना माहिती

देण्यात आली. विद्यार्थ्यांनी अवांतर परीक्षांमध्येही आपला सहभाग नोंदवावा यासाठी स्पेल बी, नेल्टस, ऑलंपियाड आणि एमटीएस या परीक्षांबाबत माहिती देण्यात आली.

## विद्याभवन प्राथमिक मराठी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

**मुख्याध्यापक : श्री. गणेश कणसे**

### आंतरराष्ट्रीय योगदिन

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सप्टेंबर २०१४ मध्ये झालेल्या संयुक्त राष्ट्रांच्या महासभेत २१ जून हा दिवस 'आंतरराष्ट्रीय योग दिन' म्हणून साजरा करण्याचा प्रस्ताव मांडला. यावर विस्तृत चर्चा होऊन डिसेंबर २०१४ मध्ये या दिनाला मान्यता देण्यात आली. २१ जून २०१५ रोजी पहिला आंतरराष्ट्रीय योग दिवस जगभर साजरा करण्यात आला.

महिला पतंजली योग समिती मुंबई आणि पुणे विद्यार्थी गृह, विद्याभवन शैक्षणिक संकुल यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २१ जून २०२४ रोजी प्राथमिक मराठी विभागात इ. १ली ते ४थी च्या विद्यार्थ्यांनी योग दिवस विविध योगासने आणि प्राणायाम करून साजरा केला. महिला पतंजली योग समितीच्या शिक्षिका श्रीमती गुप्ता व श्रीमती काणेकर यांनी विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व समजावून दिले व विद्यार्थ्यांना उपयुक्त अशी योगासने विद्यार्थ्यांकडून करुन घेतली. विद्यार्थ्यांचा प्रतिसाद उत्तम होता. विद्यार्थ्यांनी उत्साहाने योग दिन साजरा केला. मुख्याध्यापक श्री. गणेश कणसे यांनी उपस्थित पतंजली योग समिती शिक्षकांचे स्वागत केले व आभार मानले.

### पालकसभा

बुधवार दि. २६.६.२०२४ रोजी इ. १ली व २री तसेच गुरुवार दि. २७.६.२०२४ रोजी इ. ३री व ४थी वर्गाच्या पालकसभा घेण्यात आल्या. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ च्या संदर्भातील महत्त्वाच्या सूचना पालकसभेतून पालकांना देण्यात आल्या. वेळापत्रक, शालेय फी, शालेय शिस्त, इत्यादींवर पालकसभेत चर्चा करण्यात आली व पालकांना सूचना देण्यात आल्या. पालकांना विद्यार्थ्यांच्या शिस्त, सुरक्षा व आरोग्य याविषयी मार्गदर्शन केले.

### आषाढी एकादशी

आषाढ महिन्यातील एकादशीला फार पवित्र मानण्यात येते म्हणून या एकादशीला महाएकादशी म्हणतात. मंगळवार दि. १६.७.२०२४ रोजी विद्याभवन प्राथमिक मराठी शाळेतर्फे दिंडी सोहळा साजरा करण्यात आला. मुख्याध्यापक श्री. गणेश कणसे, पालक शिक्षक संघ व शाळा व्यवस्थापन समितीचे पालक प्रतिनिधी यांच्या हस्ते विठूरायाच्या पालखीचे पूजन करण्यात आले.

याप्रसंगी विद्यार्थी विविध संतांच्या वेशभूषेत आले होते. 'ज्ञानेश्वर माऊली तुकाराम' या ठेक्यावर विद्यार्थ्यांनी ताल धरला. गोल रिंगण करुन विद्यार्थ्यांनी वारकरी नृत्य केले. शाळेच्या परिसरात जयहरी विठ्ठलाचा जयघोष करीत विद्यार्थ्यांनी दिंडी काढली.

दिंडी सोहळयाला उपस्थित पालक प्रतिनिधींचे, मुख्याध्यापक श्री. गणेश कणसे यांनी आभार मानले. सहा.शिक्षिका श्रीमती शिल्पकला सावंत यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. अशा प्रकारे भक्तिमय वातावरणात आषाढी एकादशीचा दिंडी सोहळा पार पडला.

## विद्याभवन माध्यमिक मराठी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

**प्राचार्या : श्रीमती योगिनी राजेंद्र पोतदार**

### शिष्यवृत्ती परीक्षा निकाल

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यामार्फत फेब्रुवारी २०२४ रोजी घेतल्या गेलेल्या पूर्व उच्च प्राथमिक (इ. ५वी) व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती (इ. ८वी) परीक्षेत विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय (मराठी-सेमी इंग्रजी माध्यम) घाटकोपर मधील इ. ५वी चे १६ तर इ. ८वी चे ६ असे एकूण २२

विद्यार्थी शिष्यवृत्ती मिळवून गुणवत्ता यादीत झळकले आहेत.

**इ. ५वी व इ. ८वी शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार विद्याभवन शाळेने संपूर्ण घाटकोपर विभागात मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये प्रथम क्रमांक मिळविला आहे. तसेच संपूर्ण मुंबई उत्तर विभागातून इ. ५वी च्या निकालानुसार मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये द्वितीय क्रमांक मिळविला आहे.**

विद्याभवन शालेय संकुलामध्ये विद्यार्थ्यांच्या सातत्यपूर्ण व सर्वंकष गुणवत्ता विकासासाठी प्रयत्न केले जातात. तसेच येथे नाविन्यपूर्ण उपक्रमशील शिक्षणपध्दती राबविण्याचा सतत यशस्वी प्रयत्न केला जातो. याचेच फलित म्हणून विविध स्पर्धा परीक्षांमध्ये या शालेय संकुलातील अनेक विद्यार्थी यशस्वी कामगिरी करून शाळेचा नावलौकिक कायम ठेवत असतात.

**शिष्यवृत्ती मिळवून गुणवत्ता यादीत झळकलेल्या विद्यार्थ्यांचे, त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे व प्राचार्या श्रीमती योगिनी पोतदार यांचे कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांनी अभिनंदन करुन यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.**

**इ. ५वी शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थी पुढीलप्रमाणे :**

| अ. क्र. | विद्यार्थ्यांची नावे | गुण |
|---|---|---|
| १. | कु. ईश्वरी श्रीधर एरंडे | K-57/1977 |
| २. | कु. निलाक्षी बजरंग दिघे | K-82/1977 |
| ३. | कु. अवंतिका सुधीर वरे | K-91/1977 |
| ४. | कु. युगंधरा तुषार तोत्रे | K-265/1977 |
| ५. | कु. राम सचिन महाळे | K-372/1977 |
| ६. | कु. प्रितिका अमोल गोडसे | K-418/1977 |
| ७. | कु. अनुज चंद्रकांत काळे | K-681/1977 |
| ८. | कु. मुद्रा राजेंद्र पडळेकर | K-688/1977 |
| ९. | कु. जय सुनिल ठाकूर | K-813/1977 |
| १०. | कु. दक्ष विश्वास अतकारी | K-1153/1977 |
| ११. | कु. कृपा अनिल केदार | K-1246/1977 |
| १२. | कु. रिया अभिजीत जाधव | K-1433/1977 |
| १३. | कु. दर्शन राजेश बोरसे | K-1508/1977 |
| १४. | कु. तनुश्री विलास कणसे | K-1515/1977 |
| १५. | कु. गार्गी सचिन गवळी | K-1859/1977 |
| १६. | कु. सान्वी सुनिल एरंडे | K-1876/1977 |

**इ. ८वी शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थी पुढीलप्रमाणे :**

| अ. क्र. | विद्यार्थ्यांची नावे | गुण |
|---|---|---|
| १. | कु. तन्मय अमित पळासकर | K-7/1617 |
| २. | कु. अथर्व दीपक नारायणकर | K-29/1617 |
| ३. | कु. दिव्या सुनिल भोर | K-366/1617 |
| ४. | कु. अनुराधा खंडू गर्जे | K-367/1617 |
| ५. | कु. वीर प्रकाश मगदुम | K-652/1617 |
| ६. | कु. नयन प्रकाश लोलगे | K-737/1617 |

**पालक सभा**

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये प्रथम सत्रातील पहिली पालकसभा शनिवार दि. १३.७.२०२४ रोजी घेण्यात आली व पालक प्रतिनिधींची निवड करण्यात आली.

## विद्याभवन माध्यमिक इंग्रजी

**कार्याध्यक्ष : श्री. राजेंद्र वि. बोऱ्हाडे**

**मुख्याध्यापक : श्री. सुनिल भालचंद्र पाटील**

**अभिनंदनीय**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातर्फे मे २०२४ रोजी घेण्यात आलेल्या डिप्लोमा इन स्कूल मॅनेजमेंट (DSM) परीक्षेत विद्याभवन नं. २ च्या खालील शिक्षकांनी उज्ज्वल यश प्राप्त केले.

| अ. क्र. | शिक्षकाचे नाव | प्राप्त गुण |
|---|---|---|
| १. | सौ. संगिता अशोक मुंढे | ७६.००% |
| २. | सौ. सायली शिवप्रसाद चव्हाण | ७३.७५% |
| ३. | सौ. रश्मी कैलास बेंडाळे | ७१.८८% |
| ४. | सौ. अनुराधा संजय वाघमारे | ६९.००% |
| ५. | सौ. सुप्रिया हनुमंत महाकाळ | ६६.८८% |

**सर्व यशस्वी शिक्षकांचे हार्दिक अभिनंदन!**

## विद्यार्थ्यांसाठी मोफत वह्या वाटप

विद्याभवन हायस्कूल नं. २ च्या विद्यार्थ्यांसाठी शुक्रवार दि. २१.६.२०२४ रोजी मोफत वह्यांचे वाटप पुणे विद्यार्थी गृहाच्या कॉलेज ऑफ सायन्स अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजीचे समन्वयक श्री. मुकुल देशमुख यांच्या आसावरी चॅरिटेबल ट्रस्ट तर्फे १२० विद्यार्थ्यांना सुंदरम कंपनीच्या प्रत्येकी १० वह्यांचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे, पुणे विद्यार्थी गृहाच्या कॉलेज ऑफ सायन्स अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजीचे प्राचार्य श्री. अजयकुमार पाठक, विद्याभवन माध्यमिक मराठी विभागाच्या प्राचार्या श्रीमती योगिनी पोतदार, विद्याभवन हायस्कूल नं. २ चे मुख्याध्यापक श्री. सुनिल पाटील व समन्वयिका श्रीमती सरला नरेंद्रन् उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या शेवटी मुख्याध्यापक श्री. सुनिल पाटील यांनी श्री. मुकुल देशमुख यांचे विद्यार्थ्यांना दिलेल्या मोफत वह्यांबाबत आभार मानले.

## शिष्यवृत्ती परीक्षा निकाल

पूर्व उच्च प्राथमिक व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेची अंतिम गुणवत्ता यादी दि. २.७.२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आली. सदर परीक्षेत पुणे विद्यार्थी गृहाचे विद्याभवन नं. २ मधून इ. ५वी च्या २९ विद्यार्थ्यांनी तर इ. ८वी च्या ४० विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती प्राप्त केली.

विद्याभवन हायस्कूल नं. २ या प्रशालेने पूर्व उच्च प्राथमिक स्कॉलरशिप (इ. ५वी) परीक्षेत घाटकोपर विभागात प्रथम क्रमांक आणि मुंबई उत्तर विभागातून तृतीय क्रमांक मिळविला. तसेच पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेतही (इ. ८वी) घाटकोपर विभागातून प्रथम क्रमांक तसेच मुंबई उत्तर विभागातूनही प्रथम क्रमांक मिळविला आहे. विद्याभवन नं. २ च्या एकूण ६९ विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती प्राप्त केली.

**सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे, त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे, मुख्याध्यापकांचे व पदाधिकाऱ्यांचे कार्याध्यक्ष श्री. राजेंद्र बोऱ्हाडे यांनी अभिनंदन करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.**

इ. ५वी शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थी पुढीलप्रमाणे :

| अ.क्र. | विद्यार्थ्यांची नावे | गुण |
|---|---|---|
| १. | कु. अथर्व निलेश गाढवे | K-69/1977 |
| २. | कु. कौस्तुभी संतोष नलावडे | K-70/1977 |
| ३. | कु. लक्ष रमेश पाशकांती | K-71/1977 |
| ४. | कु. अवनी किशोर अमृतकर | K-124/1977 |
| ५. | कु. सृष्टी संदीप तोत्रे | K-229/1977 |
| ६. | कु. अर्णव संदीप उतेकर | K-270/1977 |
| ७. | कु. मयंक लक्ष्मण नाईक | K-297/1977 |
| ८. | कु. रेयांश निलेश यादव | K-299/1977 |
| ९. | कु. अनय राजेश कदम | K-379/1977 |
| १०. | कु. वेदांत शशिकांत घांगळे | K-463/1977 |
| ११. | कु. सोहम रमेश खांदेकर | K-503/1977 |
| १२. | कु. शार्दूल स्वप्निल गावडे | K-515/1977 |
| १३. | कु. आधि दीपक पुजारी | K-549/1977 |
| १४. | कु. कृशांग रोहित गवंडे | K-573/1977 |
| १५. | कु. हर्षल रामदयाल वर्मा | K-659/1977 |
| १६. | कु. प्रणय अनिल जाधव | K-663/1977 |
| १७. | कु. आर्या प्रविण मांडवकर | K-719/1977 |
| १८. | कु. सर्वेश नितेश पवार | K-810/1977 |
| १९. | कु. वेदांत प्रकाश जानकर | K-1205/1977 |
| २०. | कु. रुत्वी मिलिंद शिरसेकर | K-1323/1977 |
| २१. | कु. ध्रुव दत्ताराम जाधव | K-1339/1977 |
| २२. | कु. समर्थ संजय काळे | K-1341/1977 |
| २३. | कु. काव्या प्रमोद जाधव | K-1383/1977 |
| २४. | कु. प्रणव संदीप भेके | K-1467/1977 |
| २५. | कु.आराध्या शंकर तकाळकर | K-1525/1977 |
| २६. | कु. शुभम अशोक कोटिअन | K-1615/1977 |
| २७. | कु. दीपिका सुजित बोळे | K-1676/1977 |
| २८. | कु. वेदांत सुरेश राऊत | K-1919/1977 |
| २९. | कु. समर्थ मुकेश चौधरी | K-1955/1977 |

इ. ८वी शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थी पुढीलप्रमाणे

| अ.क्र. | विद्यार्थ्यांची नावे | गुण |
|---|---|---|
| १. | कु. शुभम विजय शिंदे | K-45/1617 |
| २. | कु. आयुष विनोद पवार | K-49/1617 |
| ३. | कु. श्रेय प्रविण जाधव | K-80/1617 |

| | | |
|---|---|---|
| ४. | कु. श्रीजित नेताजी पाटील | K-113/1617 |
| ५. | कु. सानियाबानू मोहम्मद सलिना | K-121/1617 |
| ६. | कु. अंगद निलेश शेमाडकर | K-228/1617 |
| ७. | कु. सर्वेश संदीप कदम | K-237/1617 |
| ८. | कु. अनन्या मनोज पाटील | K-250/1617 |
| ९. | कु. वेदांत रमेश कोंडुसकर | K-262/1617 |
| १०. | कु. आर्या प्रसन्ना पाध्ये | K-264/1617 |
| ११. | कु. श्रिया अतुल दिगराजकर | K-304/1617 |
| १२. | कु. आर्यन ज्ञानेश्वर पिंगट | K-371/1617 |
| १३. | कु. श्रीनिवास नितिन परब | K-378/1617 |
| १४. | कु. तेजस विजयप्रकाश कुंभार | K-384/1617 |
| १५. | कु. वेदांत प्रदीप मालोरे | K-386/1617 |
| १६. | कु. श्रावणी अजित मोरडेकर | K-434/1617 |
| १७. | कु. हर्ष नरेंद्र कोयंडे | K-459/1617 |
| १८. | कु. आस्था चंदन चौधरी | K-526/1617 |
| १९. | कु. पूर्वा रमेश मडावी | K-560/1617 |
| २०. | कु. जन्मेश महेश कांबळे | K-605/1617 |
| २१. | कु. आर्यन प्रदीप चाळके | K-630/1617 |
| २२. | कु. शौर्य दिनेश डोके | K-657/1617 |
| २३. | कु. अद्वैत लाव्हु माने | K-696/1617 |
| २४. | कु. मिताली राजेश तलावडेकर | K-749/1617 |
| २५. | कु. नैतिक नामदेव पवार | K-751/1617 |
| २६. | कु. वेदांत संदीप हांडे | K-842/1617 |
| २७. | कु. वेदिका मिलिंद जयगडे | K-847/1617 |
| २८. | कु. दृष्टी प्रणव अहिरे | K-905/1617 |
| २९. | कु. श्रेयंश सचिन धोंगडे | K-911/1617 |
| ३०. | कु. याशिका मिलिंद पाटकर | K-949/1617 |
| ३१. | कु. श्रावणी प्रदीप भालेराव | K-1003/1617 |
| ३२. | कु. अमृत सुनिल सदये | K-1211/1617 |
| ३३. | कु. तनिष्का संतोष साबळे | K-1292/1617 |
| ३४. | कु. श्रेया सुनिल बाम्हणे | K-1322/1617 |
| ३५. | कु. हर्षल घनश्याम मांजरेकर | K-1345/1617 |
| ३६. | कु. लेखा लक्ष्मीकांत जठार | K-1374/1617 |
| ३७. | कु. आशनी वैभव कासुर्डे | K-1459/1617 |
| ३८. | कु. मंथन यतिन पिळणकर | K-1487/1617 |
| ३९. | कु. रुद्र सूर्यकांत पाचलिंग | K-1596/1617 |
| ४०. | कु. जान्हवी महेश काळे | K-1603/1617 |

**चित्रपटाचे आयोजन**

शनिवार दि. ६.७.२०२४ रोजी विद्याभवन हायस्कूल नं. २ आणि विद्याभवन हायस्कूल यांचेसाठी आप्पासाहेब गरगटे सभागृहात विद्यार्थ्यांसाठी चित्रपटाचे आयोजन करण्यात आले होते. नैतिक मूल्ये, संघभावना यावर आधारित असणारा 'द रियल चॅम्पियन' हा चित्रपट विद्यार्थ्यांबरोबरच शिक्षकांच्या मनाला देखील स्पर्श करुन गेला. ग्रामीण आणि शहरी वातावरणातील फरक, त्यातून निर्माण होणारे वाद आणि त्यावर शोधलेले उत्तर ही या चित्रपटाची मूळ कथा आहे. सकाळी ८.०० ते ९.३० या दरम्यान चित्रपट दाखविण्यात आला.

**पालक सभा**

दि. १३.७.२०२४ रोजी विद्याभवन हायस्कूल नं. २ मध्ये पहिली पालक-शिक्षक संघ सभा घेण्यात आली. सदर सभेस सर्व वर्गांचे वर्गशिक्षक, पालक प्रतिनिधी आणि एक विद्यार्थी प्रतिनिधी उपस्थित होते. शिक्षक प्रतिनिधी श्री. विनोद बिरादार यांनी उपस्थितांचे स्वागत केले तसेच मुख्याध्यापक श्री. सुनिल पाटील यांनी पालक प्रतिनिधी मधून उपाध्यक्ष आणि संयुक्त सचिव यांची निवड सर्वांच्या संमतीने केली. बस सुविधा, स्पर्धा परीक्षा, अध्ययन अध्यापन पध्दती यावर चर्चा झाली. शाळेत आतापर्यंत झालेल्या विविध उपक्रमांचा आढावा घेण्यात आला. पालक प्रतिनिधींच्या शंकांचे निरसन करण्यात आले. आभार प्रदर्शनाने सभेची सांगता झाली.

***

**निधन वार्ता**

* संस्थेचे सेवक श्री. बाळकृष्ण बाबुराव कोकरे यांच्या मातोश्री श्रीमती भागुबाई बाबुराव कोकरे यांचे बुधवार दि. २४ जुलै २०२४ रोजी वयाच्या १०५ व्या वर्षी वृध्दापकाळाने दुःखद निधन झाले.

**ईश्वर त्यांचे आत्म्यास सद्‌गती देवो !**

***

# विद्याप्रशाला हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय

## तळेगाव अंजनेरी शाखा, नाशिक

**संचालक : श्री. अमोल म. जोशी**

**मुख्याध्यापक : श्री. शरद कोठावदे**

### छत्रपती राजर्षी शाहू महाराज जयंती

दि. २६ जून २०२४ रोजी विद्यालयात छत्रपती राजर्षी शाहू महाराज जयंती साजरी करण्यात आली. मुख्याध्यापक श्री. शरद कोठावदे यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. यावेळी अनेक विद्यार्थिनींनी राजर्षी शाहू महाराज यांच्या जीवनाविषयी माहिती दिली. उपशिक्षक श्री. प्रकाश गवळी यांनी राजर्षी शाहू महाराजांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याविषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली. ग्रंथपाल सौ. अर्चना गीत यांनी राजर्षी शाहू महाराजांच्या जीवनातील विविध प्रसंगांद्वारे त्यांचे अष्टपैलू व्यक्तिमत्व विद्यार्थ्यांना उलगडून सांगितले आपल्या अध्यक्षीय मनोगतातून मुख्याध्यापक श्री शरद कोठावदे यांनी राजर्षी शाहू महाराजांना आदरांजली वाहताना विद्यार्थ्यांनी शाहू महाराजांचे चरित्र अभ्यासून त्यांचे गुण अंगीकारण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन श्रीमती संगीता कुवर यांनी केले तर, आभार श्रीमती मोहिनी पंगुडवाले यांनी मानले.

### गणवेश वाटप कार्यक्रम

दि. २७ जून २०२४ रोजी देणगीदार श्रीमती शामला कुलकर्णी नाशिक यांनी दिलेले १२ गणवेश, देणगीदार सौ. शलाका विराज कुलकर्णी यांनी दिलेले १६ गणवेश, देणगीदार सौ. सुवर्णा किशोर जोशी यांनी दिलेले ४ गणवेश, देणगीदार श्री. सुनिल बलराम गीत यांनी दिलेले ३ गणवेश व देणगीदार श्री. सखाराम शंकर जाधव यांच्या देणगी व्याज विनियोगातून २ गणवेश असे एकूण ३७ गणवेश विद्यालयातील गरीब गरजू होतकरू विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक श्री. शरद कोठावदे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. यावेळी श्री. शरद कोठावदे यांनी विद्यालय व संस्थेतर्फे देणगीदारांचे आभार मानले. सदर देणगी मिळविण्यासाठी विशेष प्रयत्न करणाऱ्या ग्रंथपाल सौ. अर्चना गीत यांचेही आभार मानले.

### अभिनंदनीय वृत्त

ग्रंथपाल सौ. अर्चना सुनिल गीत यांना आर्य चाणक्य ब्राह्मण एकता मंच नाशिक यांच्यावतीने आयोजित साहित्यिक स्वातंत्र्यवीर सावरकर या विषयावरील निबंध स्पर्धेत तृतीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त केले. स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र व रोख रु. ५००/- असे पुरस्काराचे स्वरूप आहे. सदर पुरस्कार महाराष्ट्र - गोवा वकील कौन्सिलचे माजी अध्यक्ष ज्येष्ठ विधिज्ञ श्री. अविनाश भिडे यांच्या शुभ हस्ते सौ. अर्चना गीत यांना सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला.

कनिष्ठ महाविद्यालयाचे उपशिक्षक श्री. गणेश जाधव यांची महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे, यांच्याकडून नाशिक विभागासाठी इतिहास विषयाचे मुख्य नियामक पदी नियुक्ती झाली आहे. सदर मान मिळविणारे श्री. गणेश जाधव, विद्यालयातील प्रथम शिक्षक ठरले आहेत.

### कनिष्ठ महाविद्यालयीन इतिहास परिषद कार्यशाळा

दि. २७ जून व २८ जून २०२४ रोजी जळगाव येथील नूतन मराठा महाविद्यालयात अखिल भारतीय श्री शिवचरित्र साहित्य संमेलनात, महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालय इतिहास परिषदेची कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेत कनिष्ठ महाविद्यालयाचे इतिहासाचे उपशिक्षक श्री. गणेश जाधव यांनी नाशिक विभागाचे प्रतिनिधित्व करत नवीन शैक्षणिक धोरणात इतिहास विषयाचे महत्त्व, भूमिका व इतिहास विषयाच्या अभ्यासातून मिळणाऱ्या रोजगाराच्या संधी याविषयी झालेल्या चर्चा सत्रात आपले विचार मांडताना इतिहासाच्या पुस्तकातच रोजगाराच्या संधी विषयी माहिती द्यावी असे आवाहन केले. सदर बाब बालभारतीच्या प्रतिनिधींनी मान्य केली. यावेळी श्री. गणेश जाधव यांना सन्मान पत्र देऊन गौरविण्यात आले.

## उल्हास मेळावा

दि. ६ जुलै २०२४ रोजी विद्यालयात केंद्र पुरस्कृत उल्हास नव साक्षरता कार्यक्रमांतर्गत उल्हास मेळावा आयोजित करण्यात आला होता. मुख्याध्यापक श्री. शरद कोठावदे व पर्यवेक्षक श्री. संजय जोशी यांच्या हस्ते मेळाव्याचे उद्घाटन करण्यात आले. श्री. सुकदेव निंबेकर यांनी उपस्थित पालक, शिक्षक, विद्यार्थ्यांचे स्वागत केले. श्री. सुरेश वाघमारे यांनी केंद्र पुरस्कृत उल्हास नव साक्षरता कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली. अध्यक्षीय मनोगतामधून मुख्याध्यापक श्री. शरद कोठावदे यांनी आपल्या परिसरातील निरक्षर नागरिकांना साक्षर होण्यास मदत करण्याचे आवाहन उपस्थितांना केले. श्री.चेतन गोऱ्हे यांनी आभार मानले. मेळाव्यास पालक, शिक्षक आजी माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## उस्फूर्त निबंध स्पर्धा

दि. ८ जुलै२०२४ रोजी विद्यालयात ग्रंथालय उपक्रमांतर्गत इ.६ वी च्या विद्यार्थ्यांसाठी उस्फूर्त निबंध स्पर्धा घेण्यात आली. विद्यार्थ्यांना पूर्व सूचना न देता माझी आई या विषयावर निबंध लिहिण्यास सांगण्यात आले. त्यास विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद लाभला. स्पर्धेतील विजेते पुढील प्रमाणे-

| क्रमांक | विद्यार्थ्याचे नाव | इयत्ता / तुकडी |
|---|---|---|
| प्रथम | कु. देवयानी शरद पगार | ६वी अ |
| | कु. जयश्री हेमंत लोणे | ६वी ब |
| | कु. सर्वेश योगेश मोरे | ६वी अ |
| | कु. सार्थक अशोक डगळे | ६वी ब |
| द्वितीय | कु. लावण्या नामदेव पगार | ६वी अ |
| | कु. संजीवनी विष्णु निंबेकर | ६वी ब |
| | कु. साई सीताराम मोरे | ६वी अ |
| | कु. प्रसाद शरद मोरे | ६वी ब |

ग्रंथपाल सौ. अर्चना गीत यांच्याकडून यशस्वी विद्यार्थ्यांना पारितोषिके व सर्व सहभागी विद्यार्थ्यांना पेन्सिलचे बक्षीस वाटप करण्यात आले. ***

## ✲ विद्या प्रशाला हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, तळेगाव (अं.), नाशिक ✲



विविध देणगीदारांनी देणगी स्वरूपात दिलेल्या गणवेशांचे विद्यार्थ्यांना वाटप प्रसंगी मुख्याध्यापक श्री. शरद कोठावदे व शिक्षक वृंद



विविध देणगीदारांनी देणगी स्वरूपात दिलेल्या गणवेशांचे विद्यार्थ्यांना वाटप प्रसंगी मुख्याध्यापक श्री. शरद कोठावदे, पर्यवेक्षक श्री. संजय जोशी, क्रीडा शिक्षक श्री. संजय गीते व ग्रंथपाल सौ. अर्चना गीत

# डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल,म्हसरूळ–नाशिक

**कार्यवाह : श्री. संजय गुंजाळ**
**मुख्याध्यापिका : श्रीमती भारती पाटील**

**शिक्षकांना सक्षम करण्यासाठी एनइपी २०२० (NEP2020) सक्षम शिक्षण कार्यशाळा आणि डॉ. काकासाहेब देवधर यांची जयंती साजरी**

दि. १२ व १३ जून २०२४ रोजी डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल तर्फे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० लागू करण्यासाठी कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. नर्सरी ते उच्च माध्यमिक विभागातील शिक्षकांना याचा फायदा झाला. श्री. सुनिल भाकरे यांनी शैक्षणिक नियोजन आणि शिक्षकांची जबाबदारी, शैक्षणिक धोरणानुसार शैक्षणिक गुणवत्ता व शैक्षणिक दृष्टिकोन ठरविणे, समकालीन अभ्यासक्रमांची रचना करणे, तसेच मूल्यांकनाची पद्धती याबाबत सहभागींना मार्गदर्शन केले. यामध्ये एचपीसी रिपोर्ट कार्ड प्रणालीची सविस्तर माहिती देण्यात आली.

याप्रसंगी डॉ. काकासाहेब देवधरांना संगीतमय श्रद्धांजली आणि त्यांच्या जीवनातील विशेष प्रसंगाचे सादरीकरण करण्यात आले. कार्यवाह श्री. संजय गुंजाळ यांनी काकासाहेब देवधरांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. याप्रसंगी मुख्याध्यापिका सौ. प्रतिमा वैद्य, मुख्याध्यापिका श्रीमती भारती पाटील आणि किंडर गार्डन विभागाच्या समन्वयिका सौ. मनिषा साठे व इतर कर्मचारी वर्ग उपस्थित होता. एन इ पी २०२० या शैक्षणिक धोरणानुसार शिक्षकांना कार्यक्षम करण्याबरोबरच डॉ. काकासाहेब देवधरांनी नेमून दिलेल्या धोरणाचा वारसाही पुढे नेण्याचे कर्तव्य याप्रसंगी नमूद करण्यात आले.

**शैक्षणिक वर्ष २०२४-२५ ची उत्साहात सुरूवात व डॉ. अण्णासाहेब खैर यांची जयंती साजरी**

दि. १५ जून २०२४ रोजी, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ उत्साहात सुरू झाले. यावर्षी आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांचे मुख्याध्यापिका व सर्व शिक्षकांनी स्वागत केले. या दिवशी शिक्षणमहर्षी कै. डॉ. ग. श्री. तथा अण्णासाहेब खैर यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी मुख्याध्यापिका श्रीमती भारती पाटील यांनी विद्येची देवता सरस्वती आणि डॉ. अण्णासाहेब खैर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. डॉ. ग. श्री. खैर यांनी शाळा व संस्थेच्या हितासाठी केलेल्या परिश्रमांची विद्यार्थ्यांना माहिती दिली. तसेच मुख्याध्यापकांनी विद्यार्थ्यांना संबोधित करून शाळेचा दृष्टिकोन आणि कार्यक्षमतेसंबंधी माहिती दिली.

**डॉ. काकासाहेब देवधर शाळेचा २३ वा वर्धापन दिन उत्साहात व कृतज्ञतेने साजरा-**

दि.१६ जून २०२४ रोजी डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूलचा २३ वा स्थापना दिन उत्साही वातावरणात साजरा झाला. कार्यवाह श्री. संजय गुंजाळ आणि विविध विद्याशाखेचे प्रमुख यांच्या हस्ते कै. डॉ. काकासाहेब देवधर यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. कार्यवाह श्री. संजय गुंजाळ यांनी कै. डॉ. काकासाहेब देवधर यांच्या जीवन कार्याची माहिती सांगितली. त्यांच्या दूरदृष्टी आणि समर्पणामुळे विकास शक्य झाला आहे असे नमूद केले. चित्रफित सादरीकरणाने शाळेच्या यशस्वी प्रवासावर प्रकाश टाकण्यात आला. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळा सदैव प्रयत्नशील राहील असे आश्वासन विद्यार्थ्यांना देण्यात आले.

**जागतिक योग दिन उत्साहात साजरा**

दि. २१ जून २०२४ रोजी शाळेच्या प्रांगणात जागतिक योग दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी नाशिकचे महाराष्ट्र विद्याधामचे शिक्षक श्री. किशोर भंडारी हे त्यांच्या सहकाऱ्यांसमवेत उपस्थित होते. कार्यवाह श्री. संजय गुंजाळ व सर्व विभाग प्रमुखांची उपस्थिती होती. त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांना श्री. किशोर भंडारी यांनी योगासनाचे महत्त्व सांगितले. आपले आरोग्य चांगले व सुस्थितीत ठेवू, असा संकल्प ही विद्यार्थ्यांकडून करून घेतला. योगदिन कार्यक्रमाची सांगता प्रार्थनेने करण्यात आली. ***

# डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल,म्हसरूळ–नाशिक

**कार्यवाह : श्री. संजय गुंजाळ**

**मुख्याध्यापिका : सौ. प्रतिमा वैद्य**

## प्राथमिक विभाग

### शिक्षक प्रशिक्षण कार्यशाळा

दि. ६ जून २०२४ रोजी रत्नसागर पब्लिकेशनद्वारे इला कापडिया यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्यांनी शिक्षकांना पाठ टाचण कसे काढावे आणि वर्ग व्यवस्थापन कसे करावे, याबद्दल मार्गदर्शन केले. तसेच त्यांनी शिक्षकांचे विविध उपक्रम घेतले.

### NEP प्रशिक्षण

दि. १२ आणि १३ जून २०२४ रोजी पूर्व प्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक अशा सर्व स्तरांवर अध्यापन करणाऱ्या शिक्षकांसाठी प्रशिक्षण सत्र आयोजित करण्यात आले होते. श्री. भाकरे यांनी नवीन शैक्षणिक धोरण आणि त्याची अंमलबजावणी याबद्दल शिक्षकांना मार्गदर्शन केले. नवीन शैक्षणिक धोरणानुसार अभ्यासक्रमातील बदल तसेच याबाबत अध्यापनात घ्यावयाची काळजी याबद्दल मार्गदर्शन केले.

### डॉ. काकासाहेब देवधर जयंती

दि. १३ जून २०२४ रोजी डॉ. काकासाहेब देवधर यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यवाह श्री. संजय गुंजाळ यांनी डॉ. काकासाहेब देवधर यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण केला. या प्रसंगी मुख्याध्यापिका सौ. प्रतिमा वैद्य, अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोज भालेराव, शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश पाटील, पूर्व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. मनिषा साठे उपस्थित होत्या. शिक्षिका सौ. तेजस्विनी गायकवाड यांनी डॉ. देवधरांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याची माहिती सांगितली. डॉ. देवधरांच्या कार्यावर कुलकर्णी यांनी लिहिलेली कविता शाळेच्या संगीत शिक्षिका युगश्री यांनी सुमधुर आवाजात गायली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. रत्ना गोसावी यांनी केले.

### शैक्षणिक वर्ष २०२४ - २५ चा शुभारंभ

दि. १५ जून २०२४ पासून नवीन शैक्षणिक वर्षाचा आरंभ झाला. यावेळी शाळेची इमारत फुग्यांनी सजविण्यात आली होती. इ. १लीच्या विद्यार्थ्यांनी स्वागत नृत्य केले. इ. १ ली ते ७वीच्या विद्यार्थ्यांचे शाळेतर्फे स्वागत करण्यात आले. मुख्याध्यापिका सौ. प्रतिमा वैद्य यांनी सरस्वती पूजन करून विद्यार्थ्यांचे स्वागत केले. शिक्षिका सौ. वैशाली मुंदाणकर यांनी स्वागतपर भाषण केले. यावेळी विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले.

### श्री अण्णासाहेब खैर जयंती

दि. १५ जून २०२४ रोजी शिक्षणमहर्षी कै. डॉ. ग. श्री. तथा अण्णासाहेब खैर यांची जयंती साजरी करण्यात आली. मुख्याध्यापिका सौ. प्रतिमा वैद्य यांनी अण्णासाहेब खैर यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण केला. शिक्षिका सौ. वैशाली मुंदाणकर यांनी कै. अण्णासाहेब खैर यांच्या कार्याची माहिती दिली.

### शाळा वर्धापन दिन

दि. १६ जून २०२४ शाळेचा २३ वा वर्धापनदिन साजरा करण्यात आला. यावेळी शाळा रंगीबेरंगी फुग्यांनी सजविण्यात आली होती. पुणे विद्यार्थी गृहाचे संस्थापक कुलगुरु दादासाहेब केतकर आणि शिक्षणमहर्षी डॉ. अण्णासाहेब खैर, डॉ. काकासाहेब देवधर यांना पुष्पांजली अर्पण करून कार्यक्रमाची सुरूवात झाली. शाळेचा २३ वर्षांचा यशस्वी आढावा पॉवर पॉइंट प्रेझेन्टेशनद्वारे दाखविण्यात आला. याप्रंसगी कार्यवाह श्री. संजय गुंजाळ, अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोज भालेराव, शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश पाटील, वाणिज्य, विज्ञान व कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय वाकचौरे, मुख्याध्यापिका श्रीमती पाटील, मुख्याध्यापिका सौ. प्रतिमा वैद्य आणि शाळेचे सर्व

शिक्षकवृंद उपस्थित होते. कार्यवाह श्री. संजय गुंजाळ यांनी सर्व शिक्षकांना अनुकरणीय शिक्षक होण्यासाठी प्रयत्न करा, असे सांगितले आणि कुलगुरु दादासाहेब केतकर आणि शिक्षणमहर्षी डॉ. अण्णासाहेब खैर, डॉ. काकासाहेब देवधर यांच्या कार्याची माहिती दिली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका सौ. मुंदाणकर व सौ. गाजरे यांनी केले.

### आंतरराष्ट्रीय योगदिन

दि. २१ जून २०२४ रोजी शाळेमध्ये आंतरराष्ट्रीय योगदिन उत्साहात साजरा करण्यात आला. योग साधनेमुळे मानसिक, बौद्धिक व शारीरिक विकास होण्यासाठी मदत होते. तसेच विद्यार्थ्यांच्या एकाग्रतेत वाढ होते. शाळेत योगसाधनेचे महत्त्व विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवण्यासाठी जागतिक योगदिन साजरा करण्यात येतो. महाराष्ट्र योग शिक्षक श्री. किशोर भंडारी यांनी सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी विविध योगासने व प्राणायाम विद्यार्थ्यांकडून करून घेण्यात आला. योगसाधनेसाठी योग शिक्षक सौ. प्रिया जोशी यांनीदेखील मार्गदर्शन केले. यावेळी कार्यवाह श्री. संजय गुंजाळ, अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोज भालेराव, शिक्षणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुरेश पाटील, वाणिज्य, विज्ञान व कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय वाकचौरे, माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका श्रीमती पाटील, प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. प्रतिमा वैद्य, पूर्वप्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. मनिषा साठे आणि सर्व विभागाचे प्रमुख व शिक्षक, तसेच संस्थेच्या म्हसरूळ संकुलातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी योग साधनेत सहभाग नोंदवला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका सौ. सोनाली जोशी यांनी केले.

### कराटे स्पर्धा

दि. ९ जून २०२४ रोजी २२ व्या आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ही स्पर्धा अंधेरी मुंबई येथे पार पडली. या स्पर्धेत विद्यार्थी कु. सिद्धेश मते याने सुवर्ण व कांस्य पदक पटकावले.

### अभिनंदनीय

### इंग्लिश मॅरेथॉन

१० व्या राज्यस्तरीय इंग्लिश मॅरेथॉन परीक्षेचा निकाल घोषित करण्यात आला. ही परीक्षा एप्रिल २०२४ रोजी घेण्यात आली होती. इ. १ली ते ७वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी परीक्षेत सहभाग घेतला होता. त्यापैकी पुढील चार विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी केली. त्यांची नावे खालीलप्रमाणे.

| विद्यार्थ्याचे नाव | इयत्ता |
|---|---|
| कु. स्वयंम स्वप्नील जाधव | इ १ ली |
| कु. सर्वज्ञ संदीप शिराळ | इ ७ वी |
| कु. प्रीती महेश चौहान | इ ७ वी |
| कु. प्रथमेश महेश बोटवे | इ ७ वी |

### प्रज्ञाशोध परीक्षा निकाल

जानेवारी २०२४ मध्ये घेण्यात आलेले प्रज्ञाशोध परीक्षेस ८१ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. यावेळी शाळेतील खालील विद्यार्थ्यांनी चमकदार कामगिरी केली.

| विद्यार्थ्याचे नाव | इयत्ता | राज्यस्तरावर प्राप्त क्रमांक |
|---|---|---|
| कु. श्रावणी माळी | इ.३ री | १२५ |
| कु. हंसिका सोनवणे | इ. ४ थी | १७९ |
| कु. अनुज ढाकणे | इ.६ वी | १९६ |
| कु. रोनक पाटील | इ ६ वी | ११८९ |

**सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेच्यावतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा!**



प्रज्ञाशोध परिक्षेतील यशस्वी विद्यार्थी

### शाहू महाराज जयंती

दि. २६ जून २०२४ रोजी राजर्षी शाहू महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. शिक्षिका सौ. माधुरी अहिरे यांनी शाहू महाराजांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याची माहिती दिली.

### वसंतराव नाईक जयंती

दि. १ जुलै २०२४ रोजी वसंतराव नाईक यांची जयंती साजरी करण्यात आली. शिक्षिका सौ. नयना आहेर यांनी त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याबद्दल विद्यार्थ्यांना माहिती सांगितली.

### पूर्व प्राथमिक शिष्यवृत्ती निकाल

दि. ११ फेब्रुवारी २०२४ रोजी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती घेण्यात आली. या परीक्षेची गुणवत्ता यादी दि. २ जुलै २०२४ रोजी सादर करण्यात आली. इ. ५ वी एकूण ६२ विद्यार्थी परीक्षेसाठी प्रविष्ट झाले होते. इ. ५ वी च्या ६ विद्यार्थ्यांना गुणवत्ता यादीत स्थान मिळविले.

| विद्यार्थ्याचे नाव | प्राप्त गुण |
|---|---|
| कु. सक्षम विष्णू महाले | ७६% |
| कु. रुचा काकविपुरे | ७३% |
| कु. श्रेयस भिरूड | ७०% |
| कु. स्वर धांडे | ७०% |
| कु. मितेश देशमुख | ६७% |
| कु. मनस्वी वडजे | ६५% |

**सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे कार्यवाह श्री. संजय गुंजाळ आणि मुख्याध्यापिका सौ. प्रतिमा वैद्य यांनी अभिनंदन केले.**

### शैक्षणिक वर्ष २०२४-२५ विविध संघ स्थापना

दि. ६ जुलै २०२४ रोजी शाळेच्या पालक शिक्षक संघ, माता पालक समिती आणि विशाखा समिती २०२४-२५ साठी नवीन सदस्यांची नेमणूक करण्यात आली.

### आषाढी एकादशी पालखी सोहळा

दि. १३ जुलै २०२४ रोजी अवघ्या महाराष्ट्राचे दैवत श्री विठूरायांचा पालखी सोहळा शाळेत साजरा करण्यात आला. यावेळी शाळेतील सर्व विद्यार्थी पारंपारिक वेशभूषा करून आले. काही विद्यार्थी विठूमाउली व रखुमाईच्या वेशभूषेत आले होते. कार्यवाह श्री. संजय गुंजाळ यांनी विठ्ठल रुक्मिणीच्या प्रतिमेचे पूजन केले. शिक्षिका सौ. प्रियांका पाटील यांनी एकादशी चे महत्त्व सांगितले.

इ. १ ली ते ४ थी च्या विद्यार्थ्यांनी विठूमाऊलीच्या अभंगावर सुंदर नृत्य सादर केले. विठूमाऊलीची पालखी टाळचिपळयांच्या गजरात व विठ्ठल नामाच्या जय घोषाने शाळेचा परिसर दुमदुमला. शाळेतील सर्व विद्यार्थी मुख्याध्यापिका, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी हरिनामाच्या गजरात पालखी सोहळ्यात सहभागी झाले.

### लोकमान्य टिळक जयंती

दि. २३ जुलै २०२४ रोजी लोकमान्य टिळक जयंती साजरी करण्यात आली. शिक्षिका सौ. जयश्री रावल यांनी लोकमान्य टिळकांच्या स्वातंत्र्यलढ्याविषयी माहिती विद्यार्थ्यांना सांगितली.

### कारगिल विजय दिवस

दि. २६ जुलै २०२४ रोजी शाळेत २५ वा कारगिल विजय दिवस साजरा करण्यात आला. कारगिल युद्धात शहीद झालेल्या सैनिकांना आदरांजली वाहून त्यांच्या शौर्यगाथा शिक्षिका सौ. हर्षदा सोनवणे यांनी सांगितली.

### डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम पुण्यतिथी

दि. २७ जुलै २०२४ रोजी अब्दुल कलाम यांची पुण्यतिथी निमित्त मुख्याध्यापिका सौ. प्रतिमा वैद्य यांनी फोटोचे पुष्पहार घालून पूजन केले. शिक्षिका सौ. सोनाली शिंपी यांनी विद्यार्थ्यांना डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या कार्याची माहिती दिली.

### इंग्लिश वक्तृत्व स्पर्धा

दि. २९ जुलै २०२४ रोजी इंग्लिश वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन पुढील विषयांवर करण्यात आले होते.

**इ. ४ थी व इ. ५ वी**

१) Benefits of teamwork
२) Importance Value
३) Value of friendship

**इ. ६ वी व इ. ७ वी**

१) Celebrating festivals in an Ecofriendly way
२) The importance of recycling
३) The importance of self discipline

स्पर्धेचे विजेते खालीलप्रमाणे

**इ.४ थी व इ.५ वी**

| | | |
|---|---|---|
| १) कु. पूर्वा पदर | इ. ५ वी | प्रथम |
| २) कु. शुभ्रा बोरसे | इ. ५ वी | द्वितीय |
| ३) कु. रिया जाधव | इ. ५ वी | तृतीय |

**इ. ६वी व इ. ७ वी**

| | | |
|---|---|---|
| १) कु. मनस्वी वडजे | इ. ६ वी | प्रथम |
| २) कु. रिद्धी आहेर | इ. ६ वी | द्वितीय |
| ३) कु. स्पर्श कर्पे | इ. ७ वी | तृतीय |

✻

## ✻ डॉ. काकासाहेब देवधर इंग्लिश स्कूल,म्हसरूळ–नाशिक ✻

**पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा २०२३ –२४ शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी**



कु. सक्षम महाले
७६%



कु. रुचा काकविपुरे
७३%



कु. श्रेयस भिरूड
७०%



कु. स्वर धांडे
७०%



कु. मितेश देशमुख
६७%



कु. मनस्वी वडजे
६५%



आषाढी एकादशीनिमित्त पालखी पूजन प्रसंगी कार्यवाह श्री. संजय गुंजाळ, समवेत मुख्याध्यापिका सौ. प्रतिमा वैद्य ↑



← मुख्याध्यापिका सौ. प्रतिमा वैद्य यांच्या समवेत २०२४-२५ पालक शिक्षक संघ समिती सदस्य

# विद्याभवन-नेरुळ, नवी मुंबई शाखा

## विद्याभवन प्राथमिक इंग्रजी शाळा

### नेरूळ शाखा, नवी मुंबई

**कुलसचिव : श्री. दिनेश मिसाळ**
**प्र. मुख्याध्यापिका : सौ. मनीषा मुळीक**

**महाराष्ट्र टॅलेंट सर्च परीक्षा**

२०२३-२४ या शैक्षणिक वर्षात घेण्यात आलेल्या एमटीएस परीक्षेस एकूण ४८ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी पुढील ६ विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळविले.

| विद्यार्थ्याचे नाव | इयत्ता | क्रमांक |
|---|---|---|
| कु. श्रीराज अर्जुन नरळे | २ री | केंद्रात ६ वा |
| कु. प्रार्थना प्रवीण पाटील | ३ री | केंद्रात १ ली |
| कु. धीरज योगेश गुरव | ३ री | केंद्रात २ रा |
| कु. प्रिंस प्रसन्नकुमार कांबळे | ३ री | केंद्रात ६ वा |
| कु. अर्णव दशरथ सावंत | ४ थी | केंद्रात २ रा |
| कु. दक्ष विनायक परब | ४ थी | केंद्रात ३ रा |

**नेल्टास स्पर्धेतील विद्यार्थ्यांचे यश**

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ वर्षात आंतरराष्ट्रीय कौशल्यावर आधारित असलेल्या नेल्टास या स्पर्धा परीक्षेत अंतिम फेरीत प्राथमिक इंग्रजी विभागाच्या पुढील विद्यार्थ्यांनी सुयश संपादित केले.

| विद्यार्थ्याचे नाव | इयत्ता | विषय |
|---|---|---|
| कु. स्पृहा संजय नलावडे | ३ री | S-CAT |
| (बक्षिस - सुपर उत्कृष्ट परफॉर्मर प्रमाणपत्र व पदक ) | | |
| कु. धीरज योगेश गुरव | ४ थी | S-CAT |
| (बक्षिस - ॲचीवर प्रमाणपत्र व पदक) | | |
| कु. श्रीराज अर्जुन नरळे | ३ री | M-CAT |
| (बक्षिस - मेरीट प्रमाणपत्र व पदक) | | |
| कु. प्रार्थना प्रवीण पाटील | ४ थी | M-CAT |
| (बक्षिस - मेरीट प्रमाणपत्र व पदक) | | |
| कु. स्वरा विक्रम मुळीक | ४ थी | M-CAT |
| (बक्षिस - मेरीट प्रमाणपत्र व पदक) | | |

**सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांच्या मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटलाचीस शुभेच्छा !**

**आनंददायी शनिवार**

दि. १३ जुलै २०२४ रोजी विद्याभवन शाळा, नेरुळ येथे शालेय स्तरावर विद्यार्थ्यांना आनंददायी वातावरणातून शिक्षण मिळावे आणि तणावमुक्त अध्ययन अनुभव त्यांना घेता यावा या उद्देशाने आनंददायी शनिवार हा उपक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे श्री. गोविंद केरबा पाटील (प्राथमिक शिक्षक पनवेल, रायगड जिल्हा परिषद) हे उपस्थित होते. याशिवाय श्री. बाळासाहेब पाटील (वरिष्ठ उपसंपादक, दै. सकाळ, मुंबई) हे विशेष अतिथी म्हणून लाभले. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन अतिथींचे स्वागत करण्यात आले. प्रमुख पाहुणे श्री. गोविंद पाटील यांनी विद्यार्थ्यांना अनेक बालगीते, बडबड गीते व कविता गाऊन दाखवल्या. विशेष म्हणजे त्यांनी ही गीते शीळ वाजवून गाऊन दाखवली. तसेच शीळ वाजवण्याच्या कलेबद्दल त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शनही केले. मुख्याध्यापिका श्रीमती मनीषा मुळीक, विद्यार्थी व शिक्षकवृंद यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. शिक्षक श्री. संकेत थळे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन करुन कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

## विद्याभवन पूर्व प्राथमिक इंग्रजी शाळा

**संचालक : श्री. दिनेश मिसाळ**
**पर्यवेक्षिका : सौ. अस्मिता सलगर**

**१०वा आंतरराष्ट्रीय योग दिवस**

दि. २१ जून जागतिक योग दिवस पूर्व-प्राथमिक सेमी इंग्रजी विभागाने सादर केला. नर्सरी, छोटा शिशु, मोठा शिशु वर्गांना योगासनाचे काही प्रकार शिकविण्यात आले. यात वज्रासन, भुजंगासन हलासन व धनुरासन या आसनांचे प्रात्यक्षिक करुन घेतले. तसेच एकाग्रता वाढीसाठी विद्यार्थ्यांकडून ध्यान धारणा व ओमकार

गुंजन करुन घेतला. योग अभ्यासाला सर्व विद्यार्थ्यांनी खूप छान प्रतिसाद दिला. रोज सकाळी नित्य नियमाने योग आसनांचा सराव करा असे शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सांगितले.

**आषाढी एकादशीचा उत्सव**

दि. १६ जुलै २०२४ रोजी पूर्व-प्राथमिक मराठी व इंग्रजी माध्यमाच्या विभागाने आषाढी एकादशीचा उत्सव साजरा केला. मराठी पूर्व-प्राथमिक विभागाच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी विठ्ठलाच्या नामस्मरणावर आधारित नृत्य सादर केले. 'तुझ्या विना संसाराचा, कारभार चालना' अशा सुंदर गाण्यावर ताल धरत नृत्य सादर केले. विद्यार्थ्यांनी सर्व संतांच्या विविध व आकर्षक वेशभूषा सादर केल्या. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांच्या हस्ते पालखीचे औक्षण करुन विठ्ठलाची आरती करण्यात आली. मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ, मुख्याध्यापक श्री. गोरख कदम, समन्वयक श्री. पांडुरंग मुळीक , शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या कार्यक्रमास उपस्थित होते. पालक या कार्यक्रमात मोठ्या प्रमाणात सहभागी झाले. विठ्ठलाची पालखी शाळेच्या समोर असलेल्या विठ्ठल मंदिरात नेण्यात आली. तिथे आरती करुन सर्व भाविकांनी पांडुरंगाचे दर्शन घेतले. पालखीसह दिंडी शाळेभोवती प्रदक्षिणा घालून पुन्हा शाळेच्या प्रांगणात आली. सर्व विद्यार्थी व पालकांनी पालखीचे दर्शन घेतले. सर्वांना प्रसाद वाटप करण्यात आला.

**गुरुपौर्णिमा**

दि. १९ जुलै २०२४ रोजी पूर्व-प्राथमिक सेमी इंग्रजी विभागातर्फे गुरुपौर्णिमा साजरी करण्यात आली.

गुरुर्ब्रम्हा गुरुर्विष्णु: गुरुर्देवो महेश्वर: ।
गुरु: साक्षात् परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नम: ।।

या गुरुच्या प्रार्थनेने कार्यक्रमास सुरूवात झाली. अज्ञानाचा अंध:कार दूर करुन ज्ञानाच्या प्रकाशाची वाट दाखविणाऱ्या गुरुंचे आदरपूर्वक पूजन करण्याचा दिवस म्हणजे गुरुपौर्णिमा. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, सर्व विभागांचे मुख्याध्यापक, समन्वयक, पर्यवेक्षिका आणि प्राथमिक मराठी विभागाचे शिक्षक यांना विद्यार्थ्यांनी क्राफ्टने बनविलेल्या गुलाबाचे फूल देऊन नमस्कार केला. सर्व उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना शुभ आशीर्वाद दिले. पूर्व-प्राथमिक शिक्षिका वर्षाराणी कुचेकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# विद्याभवन प्राथमिक मराठी शाळा

## नेरूळ शाखा,नवी मुंबई

**कुलसचिव : श्री. दिनेश मिसाळ**

**मुख्याध्यापिका : सौ. सुवर्णा दिनेश मिसाळ**

**विद्याभवन स्पोर्टस् ॲकॅडमीचा शुभारंभ**

दि. ३ जुलै २०२४ रोजी विद्याभवन स्पोर्टस् ॲकॅडमीची सभा विद्याभवन शालेय सभागृहात घेण्यात आली. या सभेस कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ, श्रीमती मनीषा मुळीक, क्रीडा प्रशिक्षक, श्री. सोनेश झोरे, शिरीष तळेकर, सुवर्णा तळेकर, मंदार म्हात्रे, विविका शिंदे, सागर सावंत, सचिन लांघी, भक्ती, सुगात तसेच क्रीडा शिक्षक व मोठ्या संख्येने पालक उपस्थित होते. बास्केट बॉल, फुटबॉल, कराटे, जिम्नॅस्टिक्स, क्रिकेट इ. खेळांविषयी माहिती सांगण्यात आली. प्रत्येक खेळाचे नियम, ॲकॅडमीचे नियम स्पष्ट करण्यात आले. प्रत्येक खेळाविषयी मार्गदर्शन करण्यात आले. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांनी पालकांशी संवाद साधला. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी क्रीडा कौशल्य आवश्यक आहे. शारीरिक व मानसिक तंदुरुस्तीसाठी खेळ खेळले पाहिजेत. त्यासाठीच शाळेत स्पोर्टस् ॲकॅडमी सुरू करण्यात आली आहे. सर्व विद्यार्थ्यांनी यात सहभागी व्हावे असे सांगून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. श्रीमती आरती औचर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचलन केले.

**अभिनंदनीय**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यामार्फत फेब्रुवारी २०२४ मध्ये पूर्व उच्च-प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेत प्राथमिक मराठी विभागाचे आठ विद्यार्थी शिष्यवृत्ती मिळवून गुणवत्ता

यादीत झळकले आहेत.

| विद्यार्थ्याचे नाव | गुण | गुणवत्ता यादी क्र. |
|---|---|---|
| कु. शिंदे ओंकार दिलीप | २३० | १४१ वा |
| कु. शिंदे नंदिनी अजित | २२४ | १९२ वी |
| कु. शिंदे सोहम संदेशकुमार | १९४ | २९३ वा |
| कु. बंडगर वेदांत धोंडीराम | १९४ | २९५ वा |
| कु. शिंदे स्नेहल संतोष | १९२ | ३२६ वी |
| कु. शिंदे पियुष संतोष | १९२ | ३२७ वा |
| कु. तोडकर निर्मित सहादू | १८८ | ३९३ वा |
| कु. दगडे श्रुती जगन्नाथ | १८३ | ४१८ वी |

शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवणाऱ्या या विद्यार्थ्यांचे, त्यांच्या पालकांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ व संस्थेचे कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांनी शैक्षणिक साहित्य व गुलाबपुष्प देऊन अभिनंदन केले. पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.

## विद्यार्थी मंत्रिमंडळ निवडणूक

जे विद्यार्थी उद्याचा भारत घडविणार आहेत, जे भारताचे भविष्य आहे. त्या विद्यार्थ्यांना शालेय जीवनात लोकशाहीचे धडे मिळावेत, प्रत्यक्ष मतदान प्रकिया समजून घेता यावी यासाठी दि. ५ जुलै रोजी प्राथमिक मराठी विभागात विद्यार्थी मंत्रिमंडळासाठी निवडणूक घेण्यात आली. पृथ्वी, अग्नी, वायू, जल या प्रत्येक गटातील इ. ७ वीचे इच्छुक उमेदवार निवडणूकीसाठी उभे राहिले. प्रत्येक उमेदवाराचे चिन्ह ठरविण्यात आले. त्यानुसार उमेदवार विद्यार्थ्यांनी आपापल्या गटाचा धुमधडाक्यात प्रचार केला. प्रत्यक्ष मतदान दि. ५ जुलै रोजी घेण्यात आले. माजी विद्यार्थी श्री. संकेत वैद्य यांनी निर्माण केलेल्या व्हीबी ॲपच्या मदतीने इ. १ली ते ७वीच्या विद्यार्थ्यांनी आपल्या पसंतीच्या उमेदवारास मत दिले. मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ, श्री. गोरख कदम, सर्व शिक्षकवृंद व विद्यार्थी यांच्या उपस्थितीत निवडणूक पार पडली. विद्यार्थ्यांनी मतदानाचा अनुभव घेतला.

## विद्याभवन संकुलात साहित्य व समरसता या साहित्यिक कार्यक्रमाचे आयोजन

दि. १० जुलै २०२४ रोजी विद्याभवन या शैक्षणिक संकुलात नवी मुंबई साहित्य परिषदेतर्फे साहित्य समरसता या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ तसेच छत्रपती शिक्षण मंडळाचे अध्यक्ष व नवी मुंबई साहित्य परिषदेचे संस्थापक श्री. नंदकिशोर जोशी, साहित्य परिषद नवी मुंबई कार्यवाह श्रीमती अरुंधती जोशी, समरसता साहित्य पत्रिकेचे संपादक श्री. रविंद्र गोळे, विवेकानंद हायस्कूलचे शिक्षक श्री. संतोष मिसाळ, नवी मुंबई साहित्य परिषदेचे कार्यकर्ते श्री. दिलीप जांभळे, श्री. मिलिंद कल्याणकर, श्री. संतोष जाधव, श्रीमती वृषाली बापट, मुख्याध्यापक श्री. गोरख कदम, श्रीमती सुवर्णा मिसाळ, श्रीमती श्रीजा नायर, श्रीमती मनीषा मुळीक, पर्यवेक्षिका श्रीमती अस्मिता सलगर, समन्वयक श्री. पांडुरंग मुळीक व सर्व विभागांचे शिक्षक उपस्थित होते. या साहित्यिक कार्यक्रमाचा शुभारंभ दीपप्रज्वलनाने झाला. श्री. नंदकिशोर जोशी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. साहित्य म्हणजे भाषेपासून भावनेपर्यंतचा प्रवास, प्रत्येकाच्या मनात ऊर्मी असते, एक अंकुर असतो, त्याला प्रेरणा द्या प्रत्येकाला व्यासपीठ मिळाले पाहिजे. साहित्यिक कार्यक्रमात सहभागी व्हा, असे आवाहन त्यांनी केले. साहित्य व समरसता या विषयावर वक्ते श्री. रविंद्र गोळे यांनी आपले विचार मांडले. साहित्य समाजमनाचा आरसाच नव्हे तर त्यावेळेस त्या साहित्यिकाला दिसलेले ते चित्र आहे. जाणिवा, वेदना यातून साहित्य निर्मिती होते. सामाजिक समस्या साहित्यातूनच समोर येतात आणि त्यातूनच समाज बदलत जातो. साहित्याच्या उगमापासूनचा प्रवास अत्यंत ओघवत्या शैलीत त्यांनी कथन केला. साहित्य कृती समजून घेतल्या पाहिजेत. साहित्यगंगा वाहती राहिली पाहिजे असे उद्बोधनपर मार्गदर्शन त्यांनी केले. श्री. संतोष मिसाळ यांनी मान्यवरांचे व उपस्थितांचे आभार मानले.

### जागरुक नवी मुंबईकर अभियान

पुणे विद्यार्थी गृहाच्या नेरुळ येथील विद्याभवन शैक्षणिक संकुलात जागरुक नवी मुंबईकर अभियान घेण्यात आले. दि. १० जुलै रोजी शालेय सभागृहात हा कार्यक्रम संपन्न झाला. नवी मुंबई सायबर क्राईम व सिक्युरिटी एक्सपर्ट विशेष पोलिस अधिकारी डॉ. विशाल माने यांनी सर्व पालक, शिक्षक व विद्यार्थ्यांशी संवाद साधला. सायबर सुरक्षा, व्यसनाधिनता आणि विद्यार्थ्यांचे भविष्य घडवण्यासाठी आवश्यक गोष्टींची सविस्तर माहिती दिली. सोशल मिडियाच्या खूप आहारी जाणे टाळले पाहिजे. बहुतेक गुन्ह्यांची सुरूवात तिथे होते. अंमली पदार्थ सेवन करणे, बाळगणे, पुरवणे, विकणे हे देखील गुन्हे असतात. व्यायाम करा, शिक्षण ध्येय ठेवा, व्यसनी व्यक्ती पासून दूर रहा. आई-वडील, शिक्षकांना आदर्श माना असा मौलिक सल्ला डॉ. विशाल माने यांनी दिला. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने पालक उपस्थित होते. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापक श्री. गोरख कदम, मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ, श्रीजा नायर, पांडुरंग मुळीक, शिक्षक, विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

### आनंददायी शीळ गाणी

आनंददायी शनिवार या उपक्रमांतर्गत शनिवार दि. १४ जुलै २०२४ रोजी शीळ गाणी या अनोख्या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. कोनवडे, जिल्हा कोल्हापूर येथील प्राथमिक शिक्षक श्री. गोविंद केरबा पाटील जिल्हा परिषद शाळेतील सदस्य हे उत्कृष्ट कवी व लेखक आहेत खास कोल्हापूर वरुन शीळ गाणी या कार्यक्रमासाठी ते उपस्थित राहिले. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ, मुख्याध्यापक श्री. गोरख कदम तसेच श्री. बाबासाहेब पाटील, सकाळ वर्तमानपत्राचे वरिष्ठ बातमीदार व संस्थेचे हितचिंतक उपस्थित होते. श्रीफळ व पुस्तकरुपी भेट देऊन अतिथींचे स्वागत करण्यात आले. श्री. गोविंद केरबा पाटील यांनी शीळ गाण्यांचा सुमधूर असा कार्यक्रम सादर केला. भाषेचा शोध लागण्यापूर्वी माणूस शीळेद्वारेही बोलत होता. ध्वनीचा सुमधुर प्रकार म्हणजे शीळ, शीळ घालणे एक कौशल्य आहे, ते आत्मसात करा असा संदेश त्यांनी दिला. शीळ वाजवत त्यांनी विविध बडबडगीते, बालगीते व काही गाणी कविता सुंदर प्रकारे सादर केल्या. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांनी शीळ गाणी या कार्यक्रमाचे कौतुक केले व खऱ्या अर्थाने आनंददायी शनिवार साजरा झाला असे सांगितले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा प्रकारचे कार्यक्रम, उपक्रम साजरे केले जातात, असे सांगून शीळ गाणी कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या.

### आरोग्य दिंडी

मंगळवार दि. १६ जुलै रोजी विद्याभवन प्राथमिक मराठी विभागातर्फे आषाढी एकादशीनिमित्त आरोग्य व स्वच्छता दिंडी काढण्यात आली. विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे महत्त्व कळावे, आरोग्याची काळजी कशी घ्यावी. या संदर्भात जनजागृती करणारी दिंडी काढण्यात आली. या दिंडीत आरोग्य सेवक पथक, बाल वारकरी पथक, वैद्यकीय पथक, लेझिम पथक, संत मंडळी वृक्षदिंडी अशी वेगवेगळी पथके होती. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांच्या हस्ते विठू माऊलीच्या पालखीचे पूजन करण्यात आले. सर्व विद्यार्थी त्यांना दिलेल्या पथकाच्या डॉक्टर, परिचारिका, वारकरी, संतमंडळी, स्वच्छता कामगार अशा विविध पोशाखात आले होते. ढोल ताशाच्या गजरात आरोग्याचे महत्त्व सांगत स्वच्छते विषयी घोषणा देत ही दिंडी शालेय परिसरात फिरली. रस्त्यावर चौकात पथनाट्यातून स्वच्छतेविषयी जनजागृती करण्यात आली. त्यानंतर जवळच्या विठ्ठल रखुमाई मंदिरात जाऊन विठ्ठलाचे दर्शन घेतले. रखुमाईचा गजर करत गाणी गात फुगड्या घातल्या. वारकऱ्यांचे सुंदर रिंगण करण्यात आले. दिंडीचा आनंद सर्व बाल वारकऱ्यांच्या चेहऱ्यावर झळकत होता. या दिंडीत संस्थेचे कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापक श्री. गोरख कदम, श्रीमती सुवर्णा मिसाळ व सर्व शिक्षक सहभागी झाले. आषाढी एकादशीच्या शुभेच्छा देऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

## वृक्षारोपण

माझी वसुंधरा अभियानांतर्गत मंगळवार दि. १६ जुलै २०२४ रोजी विद्याभवन प्राथमिक मराठी विभागात विद्यार्थी व पालकांतर्फे वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न झाला. इ. ५वीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत गुणवत्ताधारक विद्यार्थी व त्यांच्या पालकांतर्फे शाळेत पेरु, तुळस, आंबा अशा विविध रोपांची लागवड करण्यात आली. आपण लावलेल्या वृक्षाची काळजी व निगा राखण्याची जबाबदारी प्रत्येक विद्यार्थ्याने घेतली. निसर्ग मानवाचा मित्र आहे. पर्यावरणाचे व निसर्गाचे जतन आणि संरक्षण करावे. या जाणिवेतून हा वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमास मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ, विद्यार्थी, पालक व शिक्षक उपस्थित होते.

## एक राखी सैनिकांसाठी

भारतीय सैन्य हे आपल्या देशाचे धैर्य, शौर्य आणि सामर्थ्य याचे उत्तम उदाहरण आहे. देशाच्या रक्षणासाठी प्राणाची आहुती देणाऱ्या सैनिकांचे मनोधैर्य वाढविण्यासाठी, सैनिकांबद्दल आदर, प्रेम व्यक्त करण्यासाठी त्यांना आपल्या भावना समर्पित कराव्यात, या उद्देशाने, रावसाहेब चॅरिटेबल ट्रस्ट आणि विद्याभवन संकुल यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय सैनिकांसाठी राख्या व शुभेच्छापत्रे पाठविण्याचा उपक्रम हाती घेतला. दि. १९ जुलै २०२४ रोजी विद्यार्थ्यांनी स्वत: विविध साहित्य वापरुन राख्या तयार केल्या. सुंदर भेटकार्ड तयार करुन त्यावर सैनिकांसाठी संदेश व पत्र लिहिले. तुम्ही आहात म्हणूनच आम्ही सुरक्षितपणे श्वास घेऊ शकतो. तुमच्या कार्याला आमचे लाख लाख सलाम अशा शुभेच्छा विद्यार्थ्यांनी पत्राद्वारे दिल्या. सैनिकांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. रावसाहेब फाउंडेशनचे कार्यकर्ते श्री. विनोद गावडे यांनी या राख्यांचे व शुभेच्छा पत्रांचे संकलन केले. त्यावेळेस कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापक श्री. गोरख कदम, श्रीमती सुवर्णा मिसाळ, श्रीमती श्रीजा नायर, श्रीमती मनीषा मुळीक, पर्यवेक्षिका श्रीमती अस्मिता सलगर, समन्वयक श्री. पांडुरंग मुळीक उपस्थित होते

## गुरुपौर्णिमा

ज्ञानदानाचा वसा घेतलेल्या विद्याभवन प्राथमिक मराठी शाळेत शनिवार दि. २० जुलै २०२४ रोजी गुरुपौर्णिमा उत्सव साजरा करण्यात आला. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांच्या हस्ते महर्षी व्यास यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी मुख्याध्यापक श्री. गोरख कदम, श्रीमती सुवर्णा मिसाळ, विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते. गुरुंची महती सांगणाऱ्या श्लोकांचे पठण करुन गुरुंबद्दल आपल्या मनातील भावना विद्यार्थ्यांनी शब्दांतून व्यक्त केल्या. गीत गायन व भाषणे याद्वारे गुरुंविषयी महती सांगण्यात आली. विद्यार्थ्यांनी आपल्या कलेतून साकारलेली भेटकार्डे व विविध प्रकारची कागदी फुले बनवून शिक्षकांना समर्पित केली. इ. ५वी ते ७ वीच्या विद्यार्थ्यांनी वर्ग सजावट उपक्रम केला. वर्गाला तोरण बांधून, रांगोळी काढून वर्गाचे सुशोभीकरण करण्यात आले. विद्यार्थ्यांनी गुरुंचे आभार मानून त्यांना भरभरुन शुभेच्छा दिल्या.

## आंतरशालेय गीता वक्तृत्व स्पर्धा

गीतेचा प्रचार व प्रसार व्हावा या उद्देशाने माजी विद्यार्थी मंडळ, मुंबई विभाग आयोजित आंतरशालेय गीता वक्तृत्व स्पर्धा शनिवार दि. २० जुलै २०२४ रोजी घेण्यात आली. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ व ज्येष्ठ मंडळी यांच्या हस्ते भगवान श्रीकृष्णाच्या प्रतिमेचे पूजन करुन स्पर्धेचा शुभारंभ करण्यात आला. गीतेतील ५ व्या अध्यायावर बोलण्यासाठी विविध शाळेतील अनेक विद्यार्थी सहभागी झाले. यात प्राथमिक मराठी विभागातील पुढील विद्यार्थ्यांनी पारितोषिके मिळविली.

**मराठी भाषा गट इ.५ वी ते ७ वी**

| विद्यार्थ्याचे नाव | क्रमांक |
|---|---|
| कु. उल्का राजेश झगडे | प्रथम |
| कु. वेदश्री विश्वनाथ राक्षे | द्वितीय |
| कु. वेदिका अनिल कणसे | तृतीय |

**इंग्रजी भाषा गट इ.५ वी ते ७ वी**

| | |
|---|---|
| कु. विभूती दत्तात्रय गुंजाळ | प्रथम |
| कु. अनुष्का आशिष गोळे | तृतीय |

**सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांच्या मार्गदर्शक शिक्षकांचे हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा !**

**स्वच्छ सर्वेक्षण २०२४ अंतर्गत विविध उपक्रम**

स्वच्छ सर्वेक्षण २०२४ अंतर्गत विद्याभवन प्राथमिक मराठी विभागात विविध उपक्रम राबविण्यात आले. दि. १९ जुलै रोजी इ. ३री ते ७ वीच्या विद्यार्थ्यांची बुध्दिबळ या खेळाची स्पर्धा घेण्यात आली. अनेक विद्यार्थी या खेळात सहभागी झाले व बुध्दिबळ या खेळाचा आनंद घेतला. दि. २३ जुलै रोजी प्लास्टिक संकलन हा उपक्रम घेण्यात आला. इ .१ ली ते ७ वीच्या विद्यार्थ्यांनी प्लास्टिकच्या बाटल्या, पिशव्या व प्लास्टिकच्या इतर वस्तू शाळेत जमा केल्या. प्लास्टिकच्या वस्तू व पिशव्या वापरू नये, गोळा केलेल्या साहित्याचा पुनर्वापर या उद्देशाने हा उपक्रम घेण्यात आला. संकलित केलेला हा प्लास्टिक कचरा घनकचरा व्यवस्थापक विभाग नवी मुंबई यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. गुरुवार दि. १८ जुलै रोजी विद्यार्थ्यांकडून दोन ते तीन फूट उंचीचे आकाश कंदील बनवण्यात आले. आकाश कंदिलावर स्वच्छतेचे घोषवाक्य लिहून आरोग्याचा संदेश देण्यात आला. स्वच्छतेविषयी जनजागृती करण्यासाठी वरील उपक्रम राबविण्यात आले.

## विद्याभवन माध्यमिक इंग्रजी शाळा

**कुलसचिव : श्री. दिनेश मिसाळ**

**प्र. मुख्याध्यापिका : सौ. श्रीजा बा. नायर**

**१० वा आंतरराष्ट्रीय योगदिन**

दि. २१ जून २०२४ रोजी विद्याभवन संकुलात १० वा आंतरराष्ट्रीय योग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी योग शिक्षिका श्रीमती शबाना खान तसेच त्यांची कन्या कु. मंताशा खान, कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका श्रीमती श्रीजा नायर, मुख्याध्यापक श्री. गोरख कदम, शिक्षकवृंद तसेच विद्यार्थी उपस्थित होते. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांनी श्रीफळ व सदाचार चिंतनी पुस्तक भेट देऊन मान्यवरांचे स्वागत केले. तसेच विद्यार्थ्यांना योग अभ्यासाचे महत्त्व सांगितले. योगासने फक्त योग दिनानिमित्ताने न करता ती प्रत्येकाने नित्यनियमाने करावीत असे सांगितले. श्रीमती शबाना खान यांनी निरोगी व सुदृढ शरीरासाठी योगासनांचे महत्त्व विशद केले. तसेच विद्यार्थ्यांकडून पद्मासन, वृक्षासन, ताडासन, मयुरासन, हलासन, पादहस्तासन, मकरासन, त्रिकोणासन, नौकासन अशी विविध आसने तर, त्यांची कन्या मंताशा खान हिने झुंबा करवून घेतला. कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापक, मुख्याध्यापिका तसेच शिक्षकवृंद यांनी विद्यार्थ्यांसमवेत विविध आसने उत्कृष्टरित्या सादर केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्रीमती मनीषा साळुंके यांनी केले.

**लगोरी स्पर्धा**

महाराष्ट्र राज्य लगोरी असोसिएशन, ठाणे जिल्हा लगोरी संघटना व ख्राईस्ट ॲकॅडमी स्कूल कोपरखैराणे यांच्या संयुक्त विद्यमाने U-१९ वर्षाखालील ज्युनिअर राष्ट्रीय लगोरी स्पर्धेसाठी घेण्यात येणारी ८ वी महाराष्ट्र राज्य निवड चाचणी स्पर्धा दि.१६ जून २०२४ रोजी ख्राईस्ट ॲकॅडमी स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, कोपरखैराणे येथे पार पडली. या स्पर्धेत आपल्या प्रशालेतील एकूण १० विद्यार्थ्यांनी तर महाराष्ट्रातून जवळपास ४०० खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता. सदर स्पर्धेत पुढील विद्यार्थ्यांची निवड झाली.

| विद्यार्थ्यांचे नाव | इयत्ता |
|---|---|
| यशकुमार नीरजकुमार | ९ वी |
| कु. आर्यन सूर्यवंशी | १० वी |
| कु. कनिका भोपी | १० वी |

**शिष्यवृत्ती परीक्षेतील सुयश**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने फेब्रुवारी २०२४ मध्ये घेतलेल्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत माध्यमिक इंग्रजी विभागातून इ. ५ वी व इ. ८ वी च्या एकूण ०९

विद्यार्थ्यांची ठाणे जिल्ह्यातून शिष्यवृत्तीसाठी निवड झालेली आहे. शिष्यवृत्ती परीक्षेत गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांची नावे पुढीलप्रमाणे

**पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा इ. ५वी निकाल**

| विद्यार्थ्यांचे नाव | प्राप्त गुण | प्राप्त क्रमांक |
|---|---|---|
| कु. मिहीर पंढरीनाथ मिरजे | २४० | १५ |
| कु. श्रिया सूरज धांद्रुत | २१६ | ९४ |
| कु. भूमी प्रकाश शितकर | १८६ | ३७९ |
| कु. पूर्वी प्रफुल शिंदे | १८० | ४७० |

**पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा इ. ८वी निकाल**

| विद्यार्थ्यांचे नाव | प्राप्त गुण | प्राप्त क्रमांक |
|---|---|---|
| कु. आर्या सागर नाक्ती | २२० | १८ |
| कु. शिवकृष्णा किशोरकुमार पुच्चा | २१८ | २१ |
| कु. तनिष्का निरंजन धंद्रे | १८६ | ५९ |
| कु. सुहानी प्रसन्नकुमार कांबळे | १७८ | १५५ |
| कु. नेहा संतोष मंडल | १६२ | ३७८ |

**सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांच्या मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेच्या वतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा !**

**व्यसनाधिनता व सायबर सुरक्षिततेविषयी व्याख्यान**

दि. १० जुलै २०२४ रोजी पुणे विद्यार्थी गृहाच्या नेरुळ येथील विद्याभवन शिक्षण संकुलात जागरुक नवी मुंबईकर अभियान अंतर्गत पालक, शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी सायबर क्राईम आणि सिक्युरिटी एक्स्पर्ट विशेष पोलिस अधिकारी डॉ. विशाल माने, कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापक श्री. गोरख कदम, मुख्याध्यापिका सौ. श्रीजा नायर, सौ. सुवर्णा मिसाळ, समन्वयक श्री. पांडुरंग मुळीक, शिक्षक, विद्यार्थी आणि पालक उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरूवात कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ यांच्या हस्ते प्रमुख अतिथींना श्रीफळ व पुस्तकरुपी भेट देऊन करण्यात आली. विद्यार्थी सुरक्षा व सायबर अपराधांविषयी पालक, शिक्षक व विद्यार्थ्यांना जागृत करणे हा या व्याख्यानामागचा प्रमुख हेतू होता. पालक, शिक्षक व विद्यार्थ्यांशी संवाद साधताना डॉ. विशाल माने यांनी विद्यार्थ्यांनी सोशल मिडियाच्या आहारी जाणे टाळावे, व्यसनाधीनता हा एक गुन्हा आहे तसेच शिक्षण हे ध्येय ठेवावे, विद्यार्थ्यांनी आई वडील आणि शिक्षकांना आदर्श मानावे, असे मोलाचे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्री. मनोज मयेकर यांनी केले.

## विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय

**कुलसचिव : श्री. दिनेश मिसाळ**
**मुख्याध्यापक : श्री. गोरख कदम**

**महाकवी कालीदास दिनानिमित्त काव्यधारा**

आषाढ महिन्याचा पहिला दिवस महाकवी कालीदास यांची जयंती म्हणून साजरा करण्यात आला. या दिवसाचे औचित्य साधून उच्च माध्यमिक विभागामध्ये दरवर्षीप्रमाणे काव्यधारा हा काव्यवाचनाचा कार्यक्रम घेण्यात आला. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे आपल्या स्वरचीत व संकलित कविता सादर करुन बहारदार कार्यक्रम सादर केला. यावेळी जीवन, मन, प्रेम, मैत्री, शेतकऱ्यांची व्यथा इ. विषयांवर भावपूर्ण कविता सादर करुन विद्यार्थ्यांनी आपल्या सर्जनशीलता व कल्पनाशक्तीचे प्रकटन आपल्या सुमधूर कवितांमधून केले. शिक्षकांनी देखील विनोदी व आशययुक्त कविता सादर केल्या. संस्थेचे कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, समन्वयक श्री. पांडुरंग मुळीक, पर्यवेक्षिका श्रीमती शोभा लवटे तसेच सर्व शिक्षक वृंद या कार्यक्रमाला उपस्थित होते. श्री. सुजय वाबळे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

***

## ✻ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, नेरुळ शाखा, नवी मुंबई ✻

### पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा २०२३ –२४ शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी (मराठी माध्यम)



कु. शिंदे ओंकार
गुणवत्ता यादी क्र. १४१



कु. शिंदे नंदिनी
गुणवत्ता यादी क्र. १९२



कु. शिंदे सोहम
गुणवत्ता यादी क्र. २९३



कु. बंडगर वेदांत
गुणवत्ता यादी क्र. २९५



कु. शिंदे स्नेहल
गुणवत्ता यादी क्र. ३२६



कु. शिंदे पियुष
गुणवत्ता यादी क्र. ३२७



कु. तोडकर निर्मित
गुणवत्ता यादी क्र. ३९३



कु. दगडे श्रुती
गुणवत्ता यादी क्र. ४१८

### पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा २०२३ –२४ शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी (इंग्रजी माध्यम)



कु. मिरजे मिहीर
गुणवत्ता यादी क्र. १५



कु. धांद्रुत श्रिया
गुणवत्ता यादी क्र. ९४



कु. शितकर भूमी
गुणवत्ता यादी क्र. ३७९



कु. शिंदे पूर्वी
गुणवत्ता यादी क्र. ४७०

### माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा २०२३–२४ शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी (इंग्रजी आणि सेमी इंग्रजी माध्यम)



कु. नाक्ती आर्या
गुणवत्ता यादी
क्र. १८



कु. पुच्चा शिवकृष्णा
गुणवत्ता यादी
क्र. २१



कु. धंद्रे तनिष्का
गुणवत्ता यादी
क्र. ५९



कु. कांबळे सुहानी
गुणवत्ता यादी
क्र. १५५



कु. मंडल नेहा
गुणवत्ता यादी
क्र. १६२



कु. आणेकर आयुष
गुणवत्ता यादी
क्र. १०५

## ❊ विद्याभवन हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, नेरुळ शाखा, नवी मुंबई ❊



वृक्षारोपण करताना
प्राथमिक मराठी विभागाच्या
इ. ५ वीच्या शिष्यवृत्ती परीक्षेतील
गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांच्या समवेत
मुख्याध्यापिका श्रीमती सुवर्णा मिसाळ



आरोग्य दिंडीद्वारे स्वच्छता व
आरोग्याचा संदेश देऊन
जनजागृती करताना
प्राथमिक मराठी विभागाचे विद्यार्थी



MTS स्पर्धेत
उत्तम यश संपादित
केलेल्या विद्यार्थ्यांसोबत
कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ,
मुख्याध्यापिका
श्रीमती मनीषा मुळीक व
समन्वयक श्री. पांडुरंग मुळीक



राष्ट्रीय लगोरी स्पर्धेत निवड झालेले विद्यार्थी कु. कनिका भोपी, कु. यशकुमार नीरजकुमार आणि कु आर्यन सूर्यवंशी यांचेसमवेत कुलसचिव श्री. दिनेश मिसाळ, मुख्याध्यापिका श्रीमती श्रीजा नायर व क्रीडा शिक्षक श्री. सुहास राऊळ

# कॉलेज ऑफ इंजिनिअरींग व टेक्नॉलॉजी आणि जी.के.पाटे (वाणी) व्यवस्थापन महाविद्यालय, पुणे

**संचालक : श्री. सुनिल रेडेकर**

**संचालक : प्रा. राजेंद्र गो. कडुसकर**

**हार्दिक अभिनंदन**

गुरुवार दि. ११ जुलै २०२४ रोजी ताज लॅन्ड्स एन्ड हॉटेल, बांद्रा, मुंबई येथे आयोजित केलेल्या 'वर्ल्ड एज्युकेशन काँग्रेस अॅवॉर्ड्स २०२४' या कार्यक्रमात प्र. प्राचार्य डॉ. मनोज तारांबळे यांना स्व. प्रो. वाय. के. भूषण यांचे स्मृतिप्रित्यर्थ दिल्या जाणाऱ्या ''मोस्ट इन्फ्लूएन्शिअल प्रोफेसर'' या पुरस्काराने गौरविण्यात आले.

तसेच या कार्यक्रमात डॉ. मनोज तारांबळे ''अपस्किलिंग अॅण्ड रिस्किलिंग फॉर सस्टेनेबल फ्युचर'' या विषयावरील चर्चेमध्ये पॅनेल मेंबर म्हणून सहभागी झाले होते.

**इ अॅण्ड टी सी इंजिनिअरिंग विभाग**

* ई अॅण्ड टी सी विभागाच्या एकूण २१ विद्यार्थी-विद्यार्थिनींची गिरीनगर पुणे येथील DIAT (Defence Institute of Advanced Technnology) येथे प्रशिक्षणासाठी निवड झाली. Radar and Microwave Technology, VLSI, Optics आणि VLSI अशा विविध विषयांच्या प्रोजेक्ट्स एक वर्ष काम करायची अमूल्य संधी या विद्यार्थ्यांना मिळणार आहे. डॉ. कल्याणी कुलकर्णी, प्रा. तनुजा खटावकर, डॉ. माधवी बेलसरे आणि प्रा. निलेश कुचेकर यांनी या प्रशिक्षणासाठी पुढाकार घेतला. निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन!

* अणू विद्युत आणि दूरसंचार विभाग व मुद्रण अभियांत्रिकी विभाग यांनी इंस्टिट्यूट ऑफ इंजिनिअर्स, पुणे लोकल सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने १० जून ते १४ जून २०२४ या कालावधीमध्ये 'डिझाईन थिंकिंग अँड आयडिया लॅब' या विषयावर फॅकल्टी डेव्हलपमेंट वर्कशॉप आयोजित करण्यात आले होते. या FDP साठी महाविद्यालयाच्या IQAC चे माननीय सदस्य श्री. संदीप देवकर, HR Manager, Fleetguard Filters Pvt. Ltd. यांनी रु. २००००/- देणगी दिली. प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी त्यांनी दिलेल्या या सक्रिय सहभागासाठी महाविद्यालयातर्फे मा. श्री. संदीप देवकर यांचे हार्दिक आभार!

* प्रा. महेश पोतदार ३ ते १२ जून २०२४ या कालावधीत मालवीय मिशन टीचर्स ट्रेनिंग प्रोग्राममध्ये ऑनलाइन मोडमध्ये सामील झाले. त्यांनी या कोर्समध्ये ए ग्रेड मिळवला आहे.

* डॉ. प्रसन्न शेटे, प्रा. महेश पोतदार, प्रा. आनंद नजन, प्रा. प्रिया देशपांडे, प्रा. गौरी कुलकर्णी, प्रा. उषा वाळके यांनी दि. २९ एप्रिल ते ३ मे २०२४ या कालावधीत ''मशीन लर्निंग आणि इट्स अॅप्लिकेशन्स'' या विषयावर एका आठवड्याच्या फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्राममध्ये सहभाग घेतला. हा कार्यक्रम कमिन्स कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगने ऑनलाइन पद्धतीने आयोजित केला होता.

**मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभाग**

दि. १ जुलै २०२४ रोजी द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांचे विभाग प्रमुख व सर्व शिक्षक वृंद यांच्याकडून स्वागत करण्यात आले. मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागाचा २०१८ च्या बॅच चा विद्यार्थी कु. अक्षय कारंडे याने केंद्रीय सशस्त्र पोलीस दल यु. पी. एस. सी. या परीक्षेमध्ये पूर्ण देशात २८ वा क्रमांक मिळविला. कु. अक्षय कारंडे याचा विभाप्रमुख डॉ. एम. एम. भूमकर यांच्यातर्फे सत्कार करण्यात आला.

**गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी**

दि. २२ जुलै २०२४ रोजी गुरुौर्णिमेनिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या प्रसंगी श्री. प्रतिक रोहिदास धात्रक हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच डॉ. एच. जी. फाकटकर व तेजस्वी प्लास्टिक प्रा. लि. चे अध्यक्ष श्री. प्रसाद हिरळकर हे

प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मेसा कमिटी तर्फे सर्व शिक्षकांचा गुलाबाचे फूल आणि सुगंधी अत्तर देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी संचालक प्रा. राजेंद्र कडुसकर, प्र. प्राचार्य डॉ. एम. आर. तारांबळे, विभाप्रमुख डॉक्टर एम. एम. भूमकर हे उपस्थित होते.

❋ ८ जुलै २०२४ ते १२ जुलै २०२४ या काळामध्ये द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांकरिता मेसा तर्फे 'हँड्स ऑन ट्रेनिंग प्रोग्रॅम ऑन सॉलिडवर्क सॉफ्टवेअर' आयोजित करण्यात आले होते. या प्रोग्रॅममध्ये फाकटकर अकादमीचे एक्स्पर्ट श्रीयुत श्रीरंग घड्याळजी यांनी मार्गदर्शन केले.

❋ मेकॅनिकल अभियांत्रिकी विभागातर्फे दि. २९ जून २०२४ रोजी प्रथम वर्ष प्रवेश प्रक्रिया संदर्भात १२ वी पास विद्यार्थ्यांना करियर मार्गदर्शन करण्यात आले. संचालक श्री. सुनिल रेडेकर आणि प्रा. राजेंद्र कडुसकर, प्र. प्राचार्य डॉ. एम. आर. तारांबळे आणि विभाप्रमुख डॉ. एम. एम. भूमकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी कुलसचिव प्रा. दिपक पाटील हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आयोजन प्राध्यापक गणेश मोरे यांनी केले.

❋ दि. १ ते ३ जुलै २०२४ रोजी ३ दिवसांचा ट्रेनिंग प्रोग्राम, कुका या कंपनीतर्फे आयोजित करण्यात आला होता. यासाठी एक्स्पर्ट श्री. तेजस दौड यांनी मेकॅनिकल, इलेक्ट्रॉनिक्स, इलेक्ट्रिकल व आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि डाटा सायन्स या विभागांच्या प्राध्यापकांना मार्गदर्शन केले.

**अभिनंदनीय**

प्राध्यापक श्री. संकेत चिक्षे यांना आय. आय. टी. बॉम्बे यांच्याकडून एन. पी. टी. इ. एल. स्टार मिटिंग आणि एन. पी. टी. इ. एल. लोकल चॅप्टर डेव्हलपमेंट करीता आमंत्रित करण्यात आले. तसेच एन. पी. टी. इ. एल. स्टार या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

**कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभाग**

❋ दि. ४ जुलै २०२४ रोजी Greateway Software Pvt. Ltd. यांच्यासमवेत ५ वर्षांसाठी सामंजस्य करार करण्यात आला. यासाठी श्री. शशिकांत म्हसराळे, संचालक श्री. सुनिल रेडेकर आणि प्रा. राजेंद्र कडुसकर, प्र. प्राचार्य डॉ. मनोज तारांबळे यांचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले.

❋ बी. ई. कॉम्प्युटरच्या विद्यार्थ्यांसाठी दि. २० जुलै २०२४ रोजी प्रोजेक्ट ओरिएंटेशनचे आयोजन करण्यात होते. २०२३-२४ च्या बॅचच्या माजी विद्यार्थ्यांकडून प्रोजेक्ट ओरिएंटेशन देण्यात आले. माजी विद्यार्थ्यांनी अलिकडील बी. ई. विद्यार्थ्यांना त्यांच्या प्रकल्पांचा प्रवास समजावून सांगितला आणि त्यांनी त्यांचे प्रकल्प विषय कसे निवडले, त्यांना त्यांचे मार्गदर्शक कसे मिळाले, त्यांना प्रायोजकत्व आणि सहयोगी प्रकल्प कसे मिळाले, त्यांनी शोधनिबंध कसे सादर आणि प्रकाशित केले, विविध स्पर्धांमध्ये कसा भाग घेतला आणि बक्षिसे मिळवली याविषयी माहिती दिली. बी. ई. च्या विद्यार्थ्यांना त्यांच्या अंतिम वर्षाच्या प्रकल्पासाठी ते कसे पुढे जाऊ शकतात याचे मार्गदर्शन मिळाले.

**प्रिंटिंग इंजिनिअरिंग विभाग**

❋ प्रो. पद्मजा जोशी यांनी दि. ८ व ९ जुलै २०२४ रोजी, AICTE नवी दिल्ली येथे Ministry of Education च्या IKS विभागाद्वारे रसायनशास्त्र आणि धातूशास्त्रावरील शिस्तबद्ध विशिष्ट FDP मध्ये सहभाग घेतला.

❋ दि. २६ जुलै २०२४ रोजी कु. विजय जाधव सन २०२२ चा माजी विद्यार्थी याने सध्याच्या द्वितीय, तृतीय अँड फायनल इयर प्रिंटिंगच्या विद्यार्थ्यांना पॅकेजिंग करिअर बद्दल माहिती दिली.

**इन्फरमेशन टेक्नॉलॉजी विभाग**

दि. ११ जुलै २०२४ रोजी 'NBA Guidance Session' आयोजित केले होते. डॉ. सचिन साखरे, विभाग प्रमुख, कॉम्प्युटर डिपार्टमेंट, व्हीआयटी, पुणे यांनी NBA Process या विषयी मार्गदर्शन केले.

❋ अंतिम वर्ष अभियांत्रिकी वर्गातील विद्यार्थी कु. उत्कर्ष अग्रवाल यास Indian Institute of

Technology Roorkee येथे प्रशिक्षणार्थी (Paid Intern) म्हणून काम करण्याची संधी प्राप्त झाली.

* इन्फरमेशन टेक्नॉलॉजी विभागात ५४ विद्यार्थ्यांना नोकरीची संधी मिळाली असून त्यांची वार्षिक वेतन श्रेणी ही ५.२ लाख ते ९ लाख आहे.

**ए आय डी एस विभाग**

आर्टिफिशियल इंटेलिजन्स आणि डेटा सायन्स विभागाने यंदा चतुर्थ वर्षात पदार्पण केले. विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्षात नवीन संधी उपलब्ध करून देण्यासाठी डॉ. मिनाक्षी अत्रे, प्रो. विजया कानडे यांनी एस सिग्मा या कंपनीला भेट दिली. ही भेट डेटा सायन्स क्षेत्रात इंटर्नशिप मिळविण्यासाठी प्लॅन केली होती. तसेच Boostmychild या स्टार्टअप ला डॉ. मिनाक्षी अत्रे व प्रो. स्वप्ना शिंगाडे यांनी भेट दिली. विद्यार्थ्यांना फायनल इयर प्रोजेक्ट व इंटर्नशिप मिळवण्यासाठी दिलेल्या भेटीत २ मुलांना इंटर्नशिप व दोन ग्रूप्स ना प्रोजेक्ट मिळाला.

**फर्स्ट इयर इंजिनिअरिंग**

* डिझाईन थिंकिंग आणि आयडिया लॅबच्या स्थापनेसाठी, विभाग प्रमुख डॉ. कल्याणी जे. कुलकर्णी (ई आणि टीसी) आणि प्रथम वर्ष विभागाचे प्रमुख प्रा. श्रीमती ए. एस. वाघमारे तसेच शिक्षक कर्मचारी प्रा. ए. एस. मिराशी, प्रा. एस. व्ही. जोशी, प्रा. व्ही. एस., सामंत, प्रा. आर. घोष आणि प्रा. एम. एस. कोरे, दि. ४ जुलै २०२४ रोजी कॉलेज ऑफ इंजिनियरिंग पुणे (COEP) ला भेट दिली.

* COEP कॉलेजच्या मॅन्युफॅक्चरिंग इंजिनिअरिंग आणि इंडस्ट्रियल मॅनेजमेंट विभागाचे प्रमुख डॉ. अनासने एस. एस. यांनी आयडिया लॅबची स्थापना तसेच साहित्य हाताळणी आणि विविध सहाय्यक प्रयोगशाळा आणि उपकरणे याबद्दल तपशीलवार माहिती दिली.

* ६ जुलै ते १३ जुलै २०२४, Face to Face FDP (Faculty Development Program AICTE मान्यताप्राप्त आणि IIT कानपूर, उत्तर प्रदेश द्वारे प्रायोजित, UHV - III (मानव अस्तित्व, निसर्ग आणि अस्तित्व सर्वसमावेशकपणे समजून घेणे) वर हिंदीमध्ये आयोजित करण्यात आला होता. या प्रोग्रॅममध्ये प्रथम वर्ष अभियांत्रिकी विभागाचे प्राध्यापक डॉ. सौ. एस. जी. गट्टे, प्रा. सौ. ए. एस. मिराशी आणि प्रा. एम. एस. कोरे यांनी भाग घेतला.

**स्पोर्ट्स विभाग**

क्रीडा विभाग प्रमुख डॉ. नामदेव बन्ने, यांनी १९ जुलै २०२४ रोजी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, येथे विद्यावाचस्पती (Ph. D.) ची अंतिम मौखिक परीक्षा यशस्वीपणे देऊन, शारीरिक शिक्षण या विषयामध्ये विद्यावाचस्पती Ph. D. पदवी प्राप्त केली. संशोधन अभ्यास शिर्षक 'पुणे शहरातील ३० ते ४० वयोगटातील व्यायामपट्टूंच्या निरामयतेच्या अंगांचा अभ्यास' असे होते. **डॉ. नामदेव बन्ने यांचे संस्थेच्यावतीने हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा !**

**ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट विभाग**

ट्रेनिंग व प्लेसमेंट विभागाद्वारा विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या शेवटच्या वर्षात असतांनाच नामांकित कंपन्या विविध चाचण्या घेऊन निवड करतात. या चाचण्यांची पूर्वतयारी करण्याच्या दृष्टीने महाविद्यालयाने सुमारे ५५० विद्यार्थ्यांना सलग दोन आठवडे नोकरी पूर्व प्रशिक्षण दिले. सदर कार्यक्रमात ॲप्टिट्यूड टेस्ट, व्यक्तिमत्व विकास, गटचर्चा, रेजुमे लिखाण या विषयावर विविध विषयांच्या तज्ज्ञांद्वारे प्रशिक्षण देण्यात आले. श्री. अविनाश पोरे, प्राध्यापक पायल तायडे व प्रा. डॉ. एन जी जयस्वाल यांनी समन्वयकाचे काम केले. प्र. प्राचार्य डॉ. मनोज तारांबळे, संचालक श्री. सुनिल रेडेकर आणि प्रा. राजेंद्र कडुसकर व यांचे विशेष मार्गदर्शन या कार्यक्रमाला लाभले.

***

# अभियांत्रिकी व एस.एस.धामणकर व्यवस्थापन महाविद्यालय, म्हसरूळ, नाशिक

**संचालक : संजय नि. गुंजाळ**
**प्राचार्य : डॉ. एम. व्ही. भालेराव**

## महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे राज्यस्तरीय स्पर्धेत यश

महाविद्यालयातील आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड डेटा सायन्स या विभागाच्या विद्यार्थ्यांनी शनिवार दि. १३ जुलै २०२४ रोजी Winjit Technologies Pvt.Ltd. नाशिक यांच्या वतीने आयोजित FinTank-2024 या प्रोजेक्ट आयडिया राज्यस्तरीय स्पर्धेत विद्यार्थी कु. अथर्व शिंदे, कु. अक्षय धुमाळ, कु. अथर्व आहेर यांनी प्रथम क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त केले.

या विद्यार्थ्यांना रोख रक्कम रुपये तीस हजार बक्षीस देऊन गौरविण्यात आले. या यशाबरोबरच विविध स्पर्धांमध्ये यश मिळवत महाविद्यालयाने यशाची परंपरा कायम राखली आहे.

या यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांच्या मार्गदर्शकांचे कार्यवाह श्री. संजय गुंजाळ, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. व्ही. भालेराव यांनी अभिनंदन केले. या विद्यार्थ्यांना ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी, प्रा. आय. एस. सोनवणे व आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड डाटा सायन्स विभागाचे विभाग प्रमुख प्रा. एस. जी. चोरडिया यांचे मार्गदर्शन लाभले.

## महाविद्यालयाचा १४वा वर्धापन दिन उत्साहात साजरा

दि. १३ जुलै २०२४ रोजी दिंडोरी रोड म्हसरूळ येथील पुणे विद्यार्थी गृह अभियांत्रिकी महाविद्यालयाचा १४ वा वर्धापन दिन नुकताच साजरा झाला महाविद्यालयाने अल्पकाळात प्रगती करून नॅक मूल्यांकनात 'अ श्रेणी' संपादन केली.

याप्रसंगी कार्यवाह श्री. संजय गुंजाळ यांनी अभियांत्रिकी महाविद्यालयाने केलेल्या विविध कामांचा आढावा घेतला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोज भालेराव यांनी संस्थेतर्फे दिल्या जाणाऱ्या विविध योजनांची माहिती दृक्श्रव्य माध्यमातून विद्यार्थ्यांसमोर सादर केली. प्रशासकीय अधिकारी श्री. रोकडे साहेब यांनी आपल्या भाषणात बोलताना सांगितले, 'आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर व्यैयक्तिक फायद्यासाठी करावा, पण त्याचा अतिरेक करू नये.'

पुणे विद्यापीठातर्फे घेण्यात आलेल्या मे २०२४ उन्हाळी परीक्षेतील गुणवत्ताधारक ७५ विद्यार्थ्यांचा यावेळी विशेष पारितोषिक देऊन सत्कार करण्यात आला.

विद्यार्थी आणि प्राध्यापक वर्ग यांनी एका सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण केले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. निलेश कुलकर्णी आणि प्रा. सुहास धारणे यांनी केले होते.

## लोकमान्य टिळक जयंती उत्साहात साजरी

दि. २३ जुलै २०२४ रोजी महाराष्ट्रातील थोर व्यक्तिमत्व, धाडशीवृत्ती असणारे लोकमान्य टिळक यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी प्रमुख पाहुणे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. व्ही. भालेराव यांच्या हस्ते लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास सुरूवात करण्यात आली. या कार्यक्रमासाठी अॅकॅडमिक डीन प्रा. डॉ. योगिता अहिरे, प्रा. निलेश कुलकर्णी, विद्यार्थी कल्याण मंडळाचे प्रा. सुहास धारणे, ग्रंथपाल श्री. संदीप दराडे, सहाय्यक ग्रंथपाल श्री. निवृत्ती डावखर, प्राध्यापक वृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. निलेश कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. सुहास धारणे यांनी केले. आपल्या भाषणात बोलताना प्रा. सुहास धारणे यांनी सांगितले की, अखिल भारतामध्ये देशप्रेम आणि राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करण्याचे कार्य लोकमान्य टिळक यांनी केले. लोकमान्य टिळक हे

गणित विषयात खूप पारंगत होते याविषयी माहिती दिली. टिळक हे भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे नेते होते. ''स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच'' या त्यांच्या घोषणेसाठी ते ओळखले जातात. केवळ स्वत:साठी काम न करता देशाला आपले कुटुंब बनवणे हाच खरा आत्मा आहे, पुढची पायरी म्हणजे मानवतेची सेवा करणे, आणि त्याही पुढची पायरी म्हणजे देवाची सेवा करणे, अशी लोकमान्य टिळकांची विचारधारा होती. भारतातील तरुणांसाठी शिक्षणाचा दर्जा सुधारणे हे त्यांचे ध्येय होते. कु. प्राजक्ता देवरे हिने उपस्थित सर्वांचे आभार मानले.

**महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना टेक्निकल स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त**

महाविद्यालयातील आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड डाटा सायन्स या विभागाच्या विद्यार्थ्यांनी शुक्रवार दि. २ ऑगस्ट २०२४ रोजी पार पडलेल्या टेक्निकल स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला.

मातोश्री कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग एकलहरे, नाशिक यांच्या वतीने आयोजित 'टेक्निकल इव्हेंट आयडियाथॉन' २०२४ या स्पर्धेत कु. मेहुल परदेशी, कु. दिव्येश माळी, कु. सिद्धेश राजोळे, कु. अनुष्का शिरसाठ या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. या विद्यार्थ्यांना सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. या यशाबरोबरच विविध स्पर्धांमध्ये यश मिळवत महाविद्यालयाने यशाची परंपरा कायम राखली आहे.

या यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि त्यांच्या मार्गदर्शक प्राध्यपकांचे कार्यवाह श्री. संजय गुंजाळ, प्राचार्य डॉ. एम. व्ही. भालेराव यांनी अभिनंदन केले. या विद्यार्थ्यांना ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी, प्रा. आय. एस. सोनवणे व आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड डाटा सायन्स विभागाचे विभाग प्रमुख, प्रा. एस. जी. चोरडिया तसेच विभागातील प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले

***

**✻ अभियांत्रिकी व एस. एस. धामणकर व्यवस्थापन महाविद्यालय, म्हसरूळ, नाशिक ✻**



Winjit Technologies Pvt.Ltd. नाशिक यांच्यातर्फे आयोजित FinTank-2024 या प्रोजेक्ट आयडिया राज्यस्तरीय स्पर्धेत प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रथम क्रमांकाचे पारितोषिक स्वीकारताना विद्यार्थी कु. अथर्व शिंदे, कु. अक्षय धुमाळ, आणि कु. अथर्व आहेर



महाविद्यालयाच्या १४ व्या वर्धापनदिन प्रसंगी प्रमुख पाहुणे प्रशासकीय अधिकारी श्री. रोकडे साहेब यांचा सत्कार करताना कार्यवाह श्री. संजय गुंजाळ, समवेत प्राचार्य डॉ. एम. व्ही. भालेराव आणि प्राचार्य डॉ. संजय वाकचौरे

# कै. माधवराव बळवंत उर्फ काकासाहेब देशमुख विद्यालय, पंचवटी, नाशिक

**संचालक : श्री. अमोल म. जोशी**
**मुख्याध्यापक : श्री. ज्ञानेश्वर निंबेकर**

### गुरुवर्य कै. डॉ. ग. श्री. तथा अण्णासाहेब खैर जयंती साजरी

दि. १५ जून २०२४ रोजी शिक्षणमहर्षी कै. डॉ. ग. श्री. तथा अण्णासाहेब खैर यांची जयंती साजरी करण्यात आली. कै. डॉ. ग. श्री. खैर यांच्या प्रतिमेचे मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर आणि सर्व शिक्षकांनी पूजन करून अभिवादन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीमती अर्चना केकाण यांनी केले. मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी शिक्षणमहर्षी कै. डॉ. अण्णासाहेब खैर यांच्या कार्याची माहिती सांगितली. सौ. तेजश्री जोशी यांनी आभार मानले.

### विद्यालय नववर्ष प्रारंभ, नवागतांचे स्वागत आणि मोफत पाठ्यपुस्तक वितरण

दि १५ जून रोजी २०२४-२०२५ या शैक्षणिक वर्षाचा प्रारंभ झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष संचालक श्री. अमोल जोशी, मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर आणि सर्व शिक्षकांचे हस्ते गुलाबपुष्प, चॉकलेट देऊन आणि इ. ५वी ते ८वी च्या विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तक देऊन स्वागत करण्यात आले. रांगोळी काढून, पताका लावून शालेय परिसर सुशोभित करण्यात आला.

### योग दिवस

दि. २१ जून २०२४ रोजी विद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी योग दिनाचे महत्त्व सांगितले. शिक्षिका श्रीमती केकाण अर्चना यांनी पूरक हालचाली, विविध योगासने, प्राणायाम, ध्यानधारणा इत्यादींचे सादरीकरण केले. सर्व विद्यार्थी आणि शिक्षकांनी योगासने केली. सौ.तेजश्री जोशी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

### राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती

दि.२६ जून २०२४ रोजी विद्यालयात राजर्षी शाहू महाराज जयंती साजरी करण्यात आली. मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर आणि सर्व शिक्षकांनी प्रतिमापूजन करून अभिवादन केले. शिक्षक श्री. तुकाराम मंडले यांनी शाहू महाराजांच्या सामजिक, शैक्षणिक आणि जीवन कार्याविषयी माहिती सांगितली. कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी शाहू महाराजांचे जीवनातील विविध प्रसंग कथन केले. श्रीमती सुनंदा ठाकरे यांनी आभार मानले.

### आषाढी एकादशी

दि. १६ जुलै २०२४ रोजी विद्यालयात आषाढी एकादशीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष संचालक श्री. अमोल जोशी यांचे मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी स्वागत आणि सत्कार केला. संचालक श्री. अमोल जोशी यांनी श्री. विठ्ठल रुक्मिणी च्या पालखीचे पूजन केले आणि दिंडीत सहभागी झाले. विद्यालय ते गंगा घाट मार्गे विठू माऊलीचा जयघोष करत दिंडी काढण्यात आली. गंगाघाट येथे ढोल आणि लेझीम च्या तालावर रिंगण सोहळा घेण्यात आला. फेर धरून फुगड्या खेळून विठू माऊलीच्या नामाचा गजर करण्यात आला. शिक्षिका सौ. तेजश्री जोशी यांनी आषाढी एकादशीचे धार्मिक, पौराणिक महत्त्व सांगितले. इ. ५वी ते १०वीच्या विद्यार्थ्यांनी विठ्ठलाचे भजन, अभंग सदर केले. या कार्यक्रमात मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर, सर्व शिक्षकवृंद आणि विद्यार्थी सहभागी झाले. दिंडीतून

पर्यावरण संरक्षण, वृक्षांचे महत्त्व याविषयी जनजागृती करण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन श्रीमती अर्चना केकाण यांनी केले.

**गुरुपौर्णिमा**

दि. २० जुलै २०२४ रोजी विद्यालयात गुरुपौर्णिमा साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर आणि सर्व शिक्षकांनी वेदव्यासांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले.

शिक्षिका श्रीमती सुनंदा ठाकरे यांनी मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांचा गुलाबपुष्प देऊन सत्कार केला. मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी सर्व गुरुजनांचा सत्कार केला आणि गुरुपौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या.

शिक्षिका श्रीमती केकाण अर्चना यांनी विद्यार्थ्यांना गुरुशिष्यांच्या विविध कथा सांगितल्या. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. ज्ञानेश्वर निंबेकर यांनी गुरूपौर्णिमेचे महत्त्व सांगितले. या कार्यक्रमाचे प्रास्तविक आणि सूत्रसंचालन सौ. तेजश्री जोशी यांनी केले. ***

*** कै. माधवराव बळवंत उर्फ काकासाहेब देशमुख विद्यालय, पंचवटी, नाशिक ***



मोफत पाठ्यपुस्तक वाटप करताना संचालक श्री. अमोल जोशी, मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर, शिक्षिका श्रीमती सुनंदा ठाकरे शिक्षक प्रतिनिधी सौ. तेजश्री जोशी आणि विद्यार्थी



आषाढी एकादशी निमित्त श्री विठ्ठल रुक्मिणी पालखीचे पूजन करताना संचालक श्री. अमोल जोशी मुख्याध्यापक श्री. ज्ञानेश्वर निंबेकर, शिक्षिका श्रीमती सुनंदा ठाकरे

## हितचिंतक व आश्रयदाते यांच्या मदतीचे वृत्त, पुणे विभाग

**कोषाध्यक्ष – श्री. कृष्णाजी कुलकर्णी**

**दि. १.६.२०२४ ते ३०.६.२०२४**

**पुढील देणगीदारांनी संस्थेला देणगी देऊन सक्रिय सहाय्य केलेले आहे.**
**संस्थेविषयी दर्शवित असलेल्या आत्मीयतेबद्दल आम्ही सर्वांचे आभारी आहोत.**
**(देणगी व्याजाचा विनियोग देणगी प्राप्त झाल्यानंतर पुढील वर्षापासून १५ वर्षांपर्यंत केला जातो.)**

### देणगी रु. १०,००१/- वरील सर्व


गोपाळ चापडगावकर

**●नाव - श्री. श्रीकांत गोपाळ चापडगांवकर,मुंबई**
**देणगी** - रु. ३,१३,०००/-
**दिनांक** - ७.६.२०२४
**निमित्त** - कै. गोपाळ कृष्ण चापडगांवकर (मा.वि) यांचे समृतिदिनानिमित्त
रु. ३,००,०००/- (८ जून )
रु. १३,०००/- (२९ जून)
**विनियोग** - देणगी रु. २,००,०००/-
व्याज विनियोग शैक्षणिक मदत
देणगी रु. १,००,०००/-
संपूर्ण रक्कम विनियोग शैक्षणिक मदत
आणि देणगी रु. १३,०००/-
संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्नासह संपूर्ण भोजन


विजयाप्रभा इनामदार

**●नाव - विंग कमांडर पी. व्ही. इनामदार, निवृत्त (मा. वि.), मुंबई**
**देणगी** - रु. १,००,५००/-
**दिनांक** - २९.६.२०२४
**निमित्त** - कै. सौ. विजयाप्रभा प्रभाकर इनामदार यांचे जयंतीनिमित्त (९ फेब्रुवारी)
**विनियोग** - देणगी रु. १,००,०००/- रक्कम व्याज विनियोग अन्नदान (९ फेब्रुवारी)
देणगी रु. ५००/- संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्न (दि. २९ जून २०२४)

**●नाव - श्री. श्रीकृष्ण लक्ष्मण गोडबोले, पुणे**
**देणगी** - रु. १,००,०००/-
**दिनांक** - १३.६.२०२४
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - संपूर्ण देणगी रक्कम विनियोग संस्थावाढीसाठी


यशवंत पाटणकर

**●नाव - सौ. योगिनी मुकुंद पेठे, पुणे**
**देणगी** - रु. १,००,०००/-
**दिनांक** - २२.६.२०२४
**निमित्त** - कै. यशवंत शंकर पाटणकर यांचे जयंतीनिमित्त (५ मे) आणि स्मृतिदिनानिमित्त (५ नोव्हेंबर)
**विनियोग** - देणगी व्याज विनियोग इ. १० वी व इ. १२ वी मध्ये केमेस्ट्री विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास शैक्षणिक मदत

**●नाव - श्री. जगदीश विठ्ठल थोरवे, पुणे**
**देणगी** - रु. ३५,०००/-
**दिनांक** - १५.६.२०२४
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग शैक्षणिक मदत

●**नाव** - **अंजली चेतन भट्टड, पुणे**
**देणगी** - रु. ३०,०००/-
**दिनांक** - २४.६.२०२४
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मुक्तांगण इंग्लिश स्कुल, पुणे ९ येथील विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत देण्यासाठी


मधुकर जोशी

●**नाव** - **श्रीमती मेघना मधुकर जोशी, पुणे**
**देणगी** - रु. २५,५००/-
**दिनांक** - ६.६.२०२४
**निमित्त** - कै. मधुकर महादेव जोशी यांचे स्मृतिदिनानिमित्त (ज्येष्ठ वद्य ३)
**विनियोग** - देणगी रक्कम रु. २५,०००/- व्याजविनियोग अन्नदान देणगी संपूर्ण रक्कम रु. ५००/- विनियोग अन्नदान


श्यामसुंदर देशमुख

●**नाव** - **श्रीमती अपर्णा विवेक घाणेकर, डोंबिवली**
**देणगी** - रु. २५,०००/-
**दिनांक** - ५.६.२०२४
**निमित्त** - कै. श्यामसुंदर दिगंबर देशमुख यांचे स्मृतिदिनानिमित्त (५ जून)
**विनियोग** - देणगी व्याज विनियोग शैक्षणिक मदत


शिरीन गुमास्ते

●**नाव** - **श्री. शिरीष वसंत गुमास्ते, पुणे**
**देणगी** - रु. २५,०००/-
**दिनांक** - २७.६.२०२४
**निमित्त** - कै. सौ. शिरीन शिरीष गुमास्ते यांचे स्मृतिदिनानिमित्त (२८ जून)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग शैक्षणिक मदत


पांडुरंग जोशी

●**नाव** - **श्रीमती विजया पांडुरंग जोशी, पुणे**
**देणगी** - रु. २०,०००/-
**दिनांक** - २०.६.२०२४
**निमित्त** - कै. पांडुरंग दत्तात्रय जोशी यांचे स्मृतिदिनानिमित्त (भाद्रपद शुध्द १४)
**विनियोग** - देणगी व्याजविनियोग अन्नदान

●**नाव** - **सौ. रमा अ. मते, पुणे**
**देणगी** - रु. १५,०००/- **दिनांक** -१०.६.२०२४
**निमित्त** - कै. सुफला अच्युत कर्वे यांचे जयंतीनिमित्त (४ ऑगस्ट)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्नासह संपूर्ण भोजन


रमा देशपांडे

●**नाव** - **श्री. मुकुंद मोरेश्वर देशपांडे, पुणे**
**देणगी** - रु. १३,०००/-
**दिनांक** - ११.६.२०२४
**निमित्त** - कै. श्रीमती रमा मोरेश्वर देशपांडे यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्नासह संपूर्ण भोजन

●नाव - **श्री. संजय अर्जुन अमराळे, पुणे**
देणगी - रु. १३,०००/-
दिनांक - २५.६.२०२४
निमित्त - सदिच्छा देणगी
विनियोग - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग
दि. २ जुलै २०२४
मिष्टान्नासह संपूर्ण भोजन

●नाव - **श्रीमती वैजयंती सदाशिवराव गोगावले, पुणे**
देणगी - रु. ११,०००/-
दिनांक - ३.६.२०२४
निमित्त - कै. सदाशिवराव साध्वराव गोगावले
यांचे स्मृतिदिनानिमित्त
विनियोग - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग
शैक्षणिक मदत


वीणादेवी पित्ती

●नाव - **श्री. भारत मनोहर पित्ती, पुणे**
देणगी - रु. ११,०००/-
दिनांक - ५.६.२०२४
निमित्त - कै. वीणादेवी गिरीधरलाल पित्ती
यांचे स्मृतिदिनानिमित्त
(२५ मे)
विनियोग - देणगी व्याज विनियोग अन्नदान

**देणगी रु. ५,००१/- ते रु. १०,०००/-**

●नाव - **श्री. नीतीन वसंत जोशी, पुणे**
देणगी - रु. १०,०००/-
दिनांक - १५.६.२०२४
निमित्त - कै. श्रीमती सुनीता वसंत जोशी
यांचे स्मृतिदिनानिमित्त (अश्विन वद्य ४)
विनियोग - देणगी व्याजविनियोग अन्नदान

●नाव - **श्रीमती जयश्री भालचंद्र गोडबोले, पुणे**
देणगी - रु. १०,०००/-
दिनांक - २०.६.२०२४
निमित्त - कै. भालचंद्र यशवंत गोडबोले (मा. वि.)
यांचे स्मृतिदिनानिमित्त (२६ जून)
विनियोग - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग
मिष्टान्नासह संपूर्ण भोजन

●नाव - **श्री. मिलिंद अमृतकर, यू. एस. ए.,**
देणगी - रु. ५,००१/-
दिनांक - २८.६.२०२४
निमित्त - माजी विद्यार्थी ऋणविमोचनार्थ
विनियोग - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग
आश्रमस्थ विद्यार्थ्यांच्या अन्नखर्चासाठी


नीलिमा इंगळहळीकर

●नाव - **सौ. रश्मी अनिल वैद्य, डोंबिवली**
देणगी - रु. १०,०००/-
दिनांक - ३०.६.२०२४
निमित्त - कै. नीलिमा बाळकृष्ण इंगळहळीकर यांचे
स्मृतिदिनानिमित्त (३० जून)
विनियोग - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग
शैक्षणिक मदत

**देणगी रु. ४,००१/- ते रु. ५,०००/-**

●नाव - **श्रीमती सुषमा अनिल कर्वे, पुणे**
देणगी - रु. ५,०००/-
दिनांक - ५.६.२०२४
निमित्त - कै. अनिल केशव कर्वे
यांचे स्मृतिदिनानिमित्त (५ जून)
विनियोग - देणगी रु. २,५००/- संपूर्ण रक्कम
विनियोग अन्नदान
देणगी रु. २,५००/- शैक्षणिक मदत

●**नाव** - **श्रीमती पुष्पा रविंद्र धोंगडे, पुणे**
**देणगी** - रु. ५,०००/-
**दिनांक** - ७.६.२०२४
**निमित्त** - कै. कृष्णाजी रामचंद्र वाघमारे
रु. १,०००/- (५ जुलै)
कै. विठाबाई कृष्णाजी वाघमारे
रु. १,०००/- (१ नोव्हेंबर)
कै. रविंद्र रामकृष्ण धोंगडे
रु. ३,०००/- (७ जून)
यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्री. विनोद मोरेश्वर पेंडसे, पुणे**


मोरेश्वर पेंडसे


आशा पेंडसे

**देणगी** - रु. ५,०००/-
**दिनांक** - १५.६.२०२४
**निमित्त** - कै. मोरेश्वर श्रीरंग पेंडसे (१५ जून)
कै. आशा मोरेश्वर पेंडसे (९ डिसेंबर)
यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी व्याज विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्री. संजीव भास्कर दाते, भोपाळ**
**देणगी** - रु. ५,०००/-


मुरलीधर दाते


रखमाबाई दाते

**दिनांक** - २४.६.२०२४
**निमित्त** - कै. मुरलीधर हरी दाते आणि
कै. रखमाबाई मुरलीधर दाते
यांचे स्मृतिदिनानिमित्त (१९ जून)
**विनियोग** - देणगी व्याजविनियोग शैक्षणिक मदत

●**नाव** - **श्रीमती वर्षा प्रदीप जोशी, पुणे**
**देणगी** - रु.५,०००/- **दिनांक**-२४.६.२०२४
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग
धान्यखरेदीसाठी

**देणगी रु. ३,००१/- ते रु. ४,०००/-**


ॲड.एस.एन.चंद्रचूड

●**नाव** - **ॲड. एस. एन. चंद्रचुड, (मा. वि.) पुणे**
**देणगी** - रु. ३,००३/-
**दिनांक** - ९.६.२०२४
**निमित्त** - प्रतिमहा प्रमाणे
सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग
संस्थावाढीसाठी

**देणगी रु. २,००१/- ते रु. ३,०००/-**


चंद्रकांत लिमये

●**नाव** - **श्रीमती सुजाता चंद्रकांत लिमये, पुणे**
**देणगी** - रु. ३,०००/-
**दिनांक** - १२.६.२०२४
**निमित्त** - कै. चंद्रकांत वामन
लिमये यांचे
स्मृतिदिनानिमित्त
(२१ मे)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग
शैक्षणिक मदत

**●नाव** - **श्रीमती सुनंदा जगन्नाथ देशपांडे, पुणे**
**देणगी** - रु. ३,०००/-
**दिनांक** - १३.६.२०२४
**निमित्त** - कै. जगन्नाथ दत्तात्रय देशपांडे यांचे स्मृतिदिनानिमित्त (१५ जून)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**देणगी रु. १,००१/- ते रु. १,०००/-**

**●नाव** - **सौ. भारती सतिश काळे, पुणे**
**देणगी** - रु. १,००१/-
**दिनांक** - १०.६.२०२४
**निमित्त** - कै. नलिनी यशवंत काळे यांचे स्मृतिदिनानिमित्त (२ जून)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**●नाव** - **श्रीमती शुभांगी पुरुषोत्तम दामले, पुणे**
**देणगी** - रु. १,००१/-
**दिनांक** - १०.६.२०२४
**निमित्त** - कै. पुरुषोत्तम महादेव दामले यांचे स्मृतिदिनानिमित्त (१२ ऑगस्ट)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान


नारायण तपस्वी

**●नाव** - **श्रीमती शुभांगी नारायण तपस्वी, पुणे**
**देणगी** - रु. २,०००/-
**दिनांक** - २२.६.२०२४
**निमित्त** - कै. नारायण गणेश तपस्वी यांचे स्मृतिदिनानिमित्त (२२ जून)
**विनियोग** - पूर्वीच्या देणगी रकमेत समाविष्ट करुन येणाऱ्या व्याजाचा विनियोग अन्नदान

**●नाव** - **श्री. अमरेंद्र प्रभाकर गोरे, पुणे**
**देणगी** - रु. १,५००/-
**दिनांक** - २४.६.२०२४
**निमित्त** - सदिच्छा देणगी
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग तळेगांव अंजनेरी शाखावाढीसाठी

**●नाव** - **श्रीमती कुंदा अच्युत म्हैसकर, पुणे**
**देणगी** - रु. १,५००/-
**दिनांक** - २५.६.२०२४
**निमित्त** - कै. आप्तांचे पुण्यस्मरणार्थ
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**●नाव** - **श्री. चंद्रकांत गोविंद भालेराव, (मा. वि.) पुणे**
**देणगी** - रु. १,००१/-
**दिनांक** - २६.६.२०२४
**निमित्त** - कै. गोविंद लक्ष्मण भालेराव यांचे स्मृतिदिनानिमित्त (२ जुलै)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग मिष्टान्न

**देणगी रु. ५०१/- ते रु. १,०००/-**

**●नाव** - **श्री. अरविंद मनोहर मुजुमदार, पुणे**
**देणगी** - रु. १,०००/-
**दिनांक** - १२.६.२०२४
**निमित्त** - कै. इंदिराबाई मनोहर मुजुमदार यांचे जयंतीनिमित्त (२९ जून)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**●नाव** - **श्री. सुरेश वासुदेव गोरे, पुणे**
**देणगी** - रु. ५०१/-
**दिनांक** - २७.६.२०२४
**निमित्त** - कै. वासुदेव महादेव गोरे यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**देणगी रु. ५००/- खालील सर्व**

●**नाव** - **श्री. राधारमण महादेव निजामपुरकर, पुणे**
**देणगी** - रु. ५००/-
**दिनांक** - २६.६.२०२४
**निमित्त** - कै. अक्षय राधारमण निजामपुरकर यांचे स्मृतिदिनानिमित्त (१४ जून)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**नाव** - **मा. विश्वस्त आर. के. करंदीकर मेमोरियल ट्रस्ट, पुणे**
**देणगी** - रु. २५०/-
**दिनांक** - २६.६.२०२४
**निमित्त** - कै. आर. के. करंदीकर व कै. श्रीमती इंदिराबाई आर. करंदीकर यांचे स्मृतिदिनानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग संस्था वाढीसाठी

●**नाव** - **श्रीमती रेखा विश्वनाथ ठकार, पुणे**
**देणगी** - रु. १०१/-
**दिनांक** - १३.६.२०२४
**निमित्त** - कै. श्रीमती आनंदीबाई नारायण बुधकर यांचे स्मृतिदिनानिमित्त (१४ जून)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग संस्थावाढीसाठी

**वस्तुरूप देणगी अंदाजे मूल्य रु.**

१) **श्री. रमेश रंगनाथ शिंदे पुणे**
स्वतःच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त गहू २० कि., ज्वारी १० कि., तांदूळ १० कि., पाणी बाटली ४ नग, साखर १५ कि., हरबरा डाळ २ कि., हिरवे मूग १ कि., काळे उडीद १ कि., काळे तीळ १०० ग्रॅम, हातरुमाल ३ नग रु. ४,०००/-

२) **श्री. दिपक गंगाराम सरदेसाई, पुणे**
कै. गंगाराम गणेश सरदेसाई यांचे पुण्यस्मरणार्थ फुल स्केप वह्या १ डझन, लहान वह्या २ डझन रु. १,७००/-

३) **श्री. प्रदीप जगन्नाथ उपासनी, पुणे**
नात कु. आरोही उपासनी हिच्या प्रथम वाढदिवसानिमित्त, जिलेबी ५ कि., रु. ९००/-

४) **श्री. देवांश हेमंत बिहाणी, पुणे**
सदिच्छा देणगी रवा ३ कि., साखर ३ कि., बेदाणे १२५ ग्रॅम, रु. ३७३/-

**वाढदिवसानिमित्त देण्यात आलेल्या देणग्या**

**नाव** - **कल्पना रविंद्र सोनार, पुणे**
**देणगी** - रु. ११,०००/-
**दिनांक** - २६.६.२०२४
**निमित्त** - कु. स्वराली हिचे वाढदिवसानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

●**नाव** - **श्री. विकास एकनाथ डावरे, पुणे**
**देणगी** - रु. ७,०००/-
**दिनांक** - २७.६.२०२४
**निमित्त** - चि. रविराज विकास डावरे याचे वाढदिवसानिमित्त (१ जुलै)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**नाव** - **श्रीमती सुनीता विनायक नातु, पुणे**
**देणगी** - रु. ५,०००/-
**दिनांक** - २९.६.२०२४
**निमित्त** - चि. शौनक अनिरुध्द नातु याचे वाढदिवसानिमित्त (३ जुलै)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान


श्री. अजित देव

**नाव** - श्री. अजित चंद्रकांत देव, पुणे
**देणगी** - रु. १,०००/-
**दिनांक** - २१.६.२०२४
**निमित्त** - स्वतःच्या वाढदिवसानिमित्त (२१ जून)
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

**नाव** - श्री. रमेश रंगनाथ शिंदे, पुणे
**देणगी** - रु. ५०१/-
**दिनांक** - २.६.२०२४
**निमित्त** - स्वतःचे ७५ व्या वाढदिवसानिमित्त
**विनियोग** - देणगी संपूर्ण रक्कम विनियोग अन्नदान

***

## हितचिंतक व आश्रयदाते यांच्या मदतीचे वृत्त, तळेगाव (अं) शाखा

**कोषाध्यक्ष : श्री. कृष्णाजी कुलकर्णी**
**संचालक : श्री. अमोल जोशी**
**जून – जुलै २०२४**

**पुढील देणगीदारांनी संस्थेला देणगी देऊन सक्रिय सहाय्य केलेले आहे. संस्थेविषयी असलेल्या आत्मीयतेबद्दल आम्ही सर्वांचे आभारी आहोत.**

### वस्तुरूप देणगी

**नाव** - सौ. शलाका विराज कुलकर्णी, पुणे
**देणगी** - रु. १०,०००/- किमतीचे १६ गणवेश
**दिनांक** - १७.६.२०२४
**निमित्त** - सदिच्छा देणगी

**नाव** - श्रीमती शामला कृष्णाजी कुलकर्णी, नाशिक
**देणगी** - रु. ६,३७५/- किमतीचे १२ गणवेश
**दिनांक** - २७.६.२०२४
**निमित्त** - सदिच्छा देणगी

**नाव** - सौ. सुवर्णा किशोर जोशी, ठाणे
**देणगी** - रु. २,२१०/- किमतीचे ४ गणवेश
**दिनांक** - १०.७.२०२४
**निमित्त** - आषाढी एकादशीनिमित्त

**नाव** - श्री. सुनिल बलराम गीत, नाशिक
**देणगी** - रु. १,६९०/- किमतीचे ३ गणवेश
**दिनांक** - १०.७.२०२४
**निमित्त** - कु. प्रचिती सुनिल गीत हिच्या वाढदिवसानिमित्त

**नाव** - श्री. राजा बाबू सालियन, तळेगाव (अं.) नाशिक
**देणगी** - रु. ६९०/- किमतीचा १ गणवेश
**दिनांक** - २३.७.२०२४
**निमित्त** - सदिच्छा देणगी

***

## हितचिंतक व आश्रयदाते यांच्या मदतीचे वृत्त, घाटकोपर–मुंबई शाखा

**कोषाध्यक्ष – श्री. कृष्णाजी कुलकर्णी**
**कार्याध्यक्ष – श्री. राजेंद्र बोऱ्हाडे**
**दि. १.६.२०२४ ते २०.७.२०२४**

**पुढील देणगीदारांनी संस्थेला देणगी देऊन सक्रिय सहाय्य केलेले आहे. संस्थेविषयी असलेल्या आत्मीयतेबद्दल आम्ही सर्वांचे आभारी आहोत.**

**नाव** - श्रीमती ज्योती राजेंद्र देसाई, उपमुख्याध्यापिका, मुंबई
**देणगी** - रु. २,०००/-
**दिनांक** - २९.६.२०२४
**निमित्त** - स्वतःच्या वाढदिवसानिमित्त
**विनियोग** - मुंबई शाखा वाढीसाठी

***

# पुणे विद्यार्थी गृह

१७८६, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०
फोन नंबर २४४७०९२७ / २४४७०५७३

## देणगी देण्यासाठी उपयुक्त माहिती

**पुणे आश्रम वसतिगृह निवासी विद्यार्थी संख्या १७० व इतर सेवक १० = १८०**

| | |
|---|---|
| १) अ) **एक वेळचे साधे जेवण**<br>(पोळी, भाजी, वरण भात / पिठलं भाकरी) | रु. १०,०००/- |
| ब) **मिष्टान्नासह संपूर्ण भोजन**<br>(पोळी / पुरी, भाजी, मसाले भात, कोशिंबीर, भजी, पापड, लोणचे इ.)<br>**गोड पदार्थ -** (शिरा / शिक्रण / केळी यापैकी एक पदार्थ) | रु. १२,०००/- |
| क) **मिष्टान्नासह संपूर्ण भोजन**<br>(पोळी / पुरी, भाजी, मसाले भात, कोशिंबीर, भजी, पापड, लोणचे इ.)<br>**गोड पदार्थ -** (जिलेबी/शेवई खीर/तांदळाची खीर/गव्हाची खीर/दुग्धपान/फळे यापैकी फक्त एक पदार्थ) | रु. १३,५००/- |
| ड) **मिष्टान्नासह संपूर्ण भोजन**<br>(पोळी / पुरी, भाजी, मसाले भात, कोशिंबीर, भजी, पापड, लोणचे इ.)<br>**गोड पदार्थ -** (श्रीखंड / लाडू / गुलाबजाम यापैकी फक्त एक पदार्थ) | रु. १५,०००/- |
| इ) **मिसळपाव / वडापाव / पावभाजी व मसालेभात** | रु. १३,०००/- |
| ई) **गूळपोळी/पुरणपोळी व तूप/दूध** **(फक्त शनिवार व रविवार, रक्षाबंधन, घटस्थापना व दसरा या दिवशी)** | रु. १३,०००/- |
| २) **भोजनामध्ये मिष्टान्न / गोड पदार्थ खालील पैकी एक पदार्थ देणे** **(फक्त रविवारी व सणांचे दिवशी)** | |
| अ) श्रीखंड / आम्रखंड / साजूक तूपातील लाडू | रु. ५,०००/- |
| ब) गुलाबजाम / बेसनलाडू / बुंदी लाडू / मोतीचूर लाडू | रु. ४,०००/- |
| क) शिरा / जिलेबी / शेवयाची किंवा तांदळाची खीर / शिक्रण / म्हैसूरपाक | रु. ३,५००/- |
| ड) ढोकळा / बाकरवडी / सामोसा / चकली / दुध बिस्कीटे इ. | रु. ३,५००/- |
| ३) **अल्पोपहार** | |
| अ) पोहे / उपमा / शेवई उपमा / केळी | रु. ३,५००/- |
| ब) साबुदाण्याची खिचडी | रु. ४,५००/- |
| ४) देणगी व्याजविनियोग रु. ५,०००/- व त्यापेक्षा अधिक. | |

**देणगीदारांच्या अटी व इच्छेनुसार वाढदिवसानिमित्त, विवाह वाढदिवसानिमित्त व आप्तांचे पुण्यस्मरणार्थ प्रतिवर्षी संबंधित तिथी किंवा तारखेस देणगी दिल्यानंतर पुढील वर्षापासून १५ वर्षे (अन्नदानासाठी रु. ५,०००/- आणि मिष्टान्न देण्यासाठी रु. १०,०००/-) विनियोग केला जातो.**

**५) शिष्यवृत्ती / पारितोषिके - देणगी व्याजविनियोग** रु. १५,०००/-

इयत्तावार, विषयवार व प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या संस्थेच्या आश्रम वसतिगृहातील विद्यार्थ्यांस दरवर्षी व्याजातून शिष्यवृत्ती देणे.

**६) योगक्षेम खर्चासाठी देणगी संपूर्ण रक्कम विनियोग** रु. २५,०००/-

**एका वर्षाचा एका गरीब व गरजू विद्यार्थ्याचा एकूण योगक्षेम खर्च**

अ) वसतिगृह खर्च रु. १८,१००/- ब) शैक्षणिक खर्च - शालेय फी १,५००/- शालेय वह्या पुस्तके, गणवेश, शुज, आवश्यक पुस्तके, व्यवसायमाला नवनीत व इतर खर्च रु. ५,४००/-

**७) शैक्षणिक मदत**

जो विद्यार्थी गरीब, गरजू व हुशार आहे. असा विद्यार्थी प्रथम / द्वितीय / तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण होतोच असे नाही अशा विद्यार्थ्यास शैक्षणिक मदत देणे हे जास्त सोयीचे व उपयोगी ठरते. त्यासाठी देणगीदारांच्या इच्छेनुसार देणगी स्वीकारली जाते. देणगीचा संपूर्ण रक्कम विनियोग फक्त एकदा व देणगीच्या व्याजाचा विनियोग १५ वर्षे अशा दोन प्रकारे विनियोग केला जातो. (व्याज विनियोगासाठी रु. १५,०००/- व त्यापेक्षा जास्त रक्कम अपेक्षित आहे.)

* **देणगी रोख अथवा धनादेशाद्वारे स्वीकारली जाते. धनादेश कृपया 'पुणे विद्यार्थी गृह' या नावाने काढावा.**
* **याखेरीज विद्यार्थ्यांच्या दैनंदिन स्वयंपाकासाठी किराणा, धान्य व शिधा साहित्य स्वीकारले जाईल.**
* **या देणगीवर आयकर खात्याच्या कलम ८० जी नुसार ५० टक्के आयकरात सवलत मिळते.**
  **तरी कृपया भरीव देणगी देऊन संस्थेच्या कार्यास सहकार्य करावे ही नम्र विनंती.**

***

## संस्थेस देणगी पाठविण्यासंबंधीची माहिती

**या देणगीवर आयकर खात्याच्या कलम ८० जी नुसार आयकरात ५०% सवलत मिळते.**

**The details of our bank account are as follows :**

| | | |
|---|---|---|
| Bank A/c Name | : | **Pune Vidyarthi Griha** |
| Bank Name | : | **Bank of Baroda** |
| Branch | : | **Sadashiv Peth, Pune 411030** |
| Saving A/c No. | : | **04500100009842** |
| RTGS/NEFT | : | **BARB0SADASH** |
| IFSC CODE | : | **The fifth character is numeric 'zero'.** |
| Swift Code | : | **BARBIN BBPCB** |
| MICR Code | : | **411012009** |
| E-Mail | : | **pvgheadoffice@gmail.com** |

बँकेमध्ये देणगी पाठविल्यानंतर नाव, पत्ता असा कुठलाही संदर्भ आम्हांस प्राप्त होत नाही. त्यामुळे कृपया आपण वरील खात्यावर देणगी पाठविल्यानंतर खालील फोन नं. वर संपर्क करून कळवावे.

फोन नं. - ०२० २४४७०९२७ / २४४७०५७३

Ext. No. 234

**हा क्यू आर कोड स्कॅन करूनही संस्थेस देणगी देता येईल.**

**गुगल पे आणि व्हॉट्सॲप**

**मो. नं. ९६९९८७६२०३**

※ अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय आणि जी. के. पाटे वाणी व्यवस्थापन महाविद्यालय, पुणे ९ ※



'एशिया - टू - जपान' अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना जपनामध्ये नोकरीच्या संधी उपलब्ध करुन देणारा उपक्रम राबविण्यासाठी जपानच्या डेलीगेट्स यांच्या महाविद्यालयास भेट प्रसंगी उपस्थित संचालक श्री. सुनिल रेडेकर व प्रा. राजेंद्र कडुसकर आणि प्र. प्राचार्य डॉ. मनोज तारांबळे




गुरुवार दि. ११ जुलै २०२४ रोजी प्र. प्राचार्य डॉ. मनोज तारांबळे यांना 'वर्ल्ड एज्युकेशन कॉंग्रेस ॲवॉर्ड्स २०२४' या कार्यक्रमात स्व. प्रो. वाय. के. भूषण यांचे स्मृतिप्रित्यर्थ दिल्या जाणाऱ्या "मोस्ट इन्फ्लूएन्शिअल प्रोफेसर" या पुरस्काराने गौरविण्यात आले



पिंपरी - चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड रिसर्च तर्फे आयोजित राज्यस्तरीय 'नवधारा २०२४' या प्रोजेक्ट कॉम्पिटिशन मध्ये महाविद्यालयाच्या कु. श्रेया शिर्के, कु. मानसी गायकवाड, कु. अमय परदेशी, कु. व्यंकटेश मोंडे या विद्यार्थ्यांनी 'स्पायबोट : रिव्होलूशनायझिंग लॅन्ड माईन डिटेक्शन ॲण्ड सर्व्हायव्हलन्स' या विषयावर प्रोजेक्ट सादर करुन प्रथम क्रमांक मिळविला



महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी कु. अक्षय कारंडे (बी.ई.मेकॅनिकल २०१८) सन २०२४ मध्ये झालेल्या युपीएससी परीक्षा संपूर्ण भारतामधून २८ व्या क्रमांकाने आणि महाराष्ट्रामध्ये द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण होऊन असिस्टंट कमांडन्ट/एसीपी/डीवायएसपी या पदांवर नियुक्ती झाल्याबद्दल त्याचे अभिनंदन करताना संचालक श्री. सुनिल रेडेकर व प्रा. राजेंद्र कडुसकर, प्र. प्राचार्य डॉ. मनोज तारांबळे आणि डॉ. एम. एम. भूमकर

**Regd. Newspaper**
**Postal Reg. No. PCW / 168 / 2023-2025, Office of Posting *Pune PSO *GPO 411 001***
**[Publication Date 13.8.2024 Posting Date 15.8.2024]**
**SAMACHAR - RNI No. 14546 / 1957. Decl. No. SDO / PUNE / SR / 74 / 2016**
**License No. WPP - 56/2023-2025**

**✻ संस्था मुख्यालय, पुणे ✻**



दि. ११ जुलै २०२४ रोजी देणगीदार प्रा. श्रीमती आशा राणे यांनी संस्थेस रु. एक लाखाची भरीव देणगी दिली, याबद्दल स्मृतीचिन्ह देऊन कृतज्ञता व्यक्त करताना कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी, समवेत श्रीमती आशा राणे यांचे स्नेही श्री. मंदार दास्ताने

**✻ शतायुभवन, पुणे ✻**



श्री. म. न. देशमुख यांचे वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन करताना उपकार्याध्यक्ष श्री. एस. एम. जिर्गे, समवेत डावीकडून कोषाध्यक्ष श्री. कृष्णाजी कुलकर्णी, संचालक डॉ. राजेंद्र कांबळे, देणगीदार श्री. सदानंद केंघे

**♦ पुणे विद्यार्थी गृह ♦**

▣ पुणे शाखा - (०२०) २४४७०९२७, २४४७०५७३, २४४७९०५८
▣ मुंबई शाखा : (०२२) २५०६२३२२ फॅक्स : (०२२) २५०६४९३५ ▣ नवी मुंबई (नेरुळ) (०२२) २७७२३४१८
▣ नाशिक शाखा : (०२५३) २५११३०६ ▣ म्हसरुळ: (०२५३) २५३४२९१ ▣ तळेगाव अंजनेरी शाखा: (०२५९४)२२२२२७

कृपया आपल्या प्रतिक्रिया pvgsamachar@gmail.com या ई मेल वर नोंदवाव्यात.

**This monthly Samachar is printed on behalf of Pune Vidyarthi Griha by Printer and Publisher Mr. Subhash Mallappa Jirge at Maharashtra Mudranshala Chhapkhana, 1786, Sadashiv Peth, Pune 411030 and Published at Pune Vidyarthi Griha, 1786, Sadashiv Peth, Pune 411030.**
**Editor : Mr. Rajendra Vitthal Borhade**

समाचार हे मासिक पुणे विद्यार्थी गृह संस्थेकरिता मुद्रक, प्रकाशक श्री. सुभाष मल्लाप्पा जिर्गे यांनी महाराष्ट्र मुद्रणशाळा छापखाना, १७८६ सदाशिव पेठ, पुणे ४११०३० येथे छापून पुणे विद्यार्थी गृह, १७८६ सदाशिव पेठ, पुणे ४११०३० येथे प्रसिद्ध केले.
संपादक श्री. राजेंद्र विठ्ठल बोऱ्हाडे